
१३ मे १९६७
चाळीस पैसे

# माणूस




राष्ट्रपतींचे स्वागत असो!



# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

चतुर्थ आवृत्ती, सचित्र

प्रसिद्धीनंतर : मूल्य रुपये
चाळीस किमान

प्रसिद्धीपूर्व : मूल्य रुपये
सत्तावीस फक्त

पोस्टखर्च : रुपये तीन वेगळा

प्रसिद्धीपूर्व ग्राहक नोंदणीची
अखेरची मुदत : ३१ मे १९६७

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २




एक समग्र साप्ताहिक

*वर्ष : सहावे*
*अंक : पंचेचाळीसावा*
*किंमत : चाळीस पैसे*
*वार्षिक वर्गणी : वीस रुपये*

**संपादक**
श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**
*अ. मा. साधू*
*दिलीप माजगावकर*
*सौ. निर्मला पुरंदरे*

**व्यवस्था विभाग**
*अ. वा. गंधे*
*अ. वि. गणपत्ये*

*पत्ता – ४१९ नारायण, पुणे २.*
*दूरध्वनी – ५७३५९*

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

## पत्र-मैत्री

**स. न.** **एप्रिल २७**

गेल्या अंकाला ६० पैसे देताना मनात असा विचार आला की तिसाचे चाळीस, चाळीसाचे साठ या प्रमाणांत आगाऊ जाणीव न देता माणूसची मूल्य-वाढ होत राहिली तर 'माणूस' विकत घेण्याच्या निर्णयापासून परावृत्त व्हावे लागणार. पण आज पुन्हा ४० पैशांत 'माणूस' मिळाला. बरे वाटले ! लता मंगेशकर अंक छानच आहे. वैशिष्ट्यपूर्ण आहे. राशिभविष्याचे पान देशाच्या भविष्याविषयी एखाद्या विचारप्रवर्तक लेखाला द्यावयास हरकत नसावी. सुप्यातील कार्य पुढे कसे चालणार, इत्यादी गोष्टी वाचकांना सांगण्यास हर-कत नसावी—

**मुकुंद साठे,**
विष्णुनगर

**स. न.** **मे १**

२९ एप्रिलचा अंक वाचला. मुख-पृष्ठावरील श्री. फडणिसांनी काढलेले सध्याच्या परिस्थितीवर आधारलेले व्यंगचित्र आवडले. श्री. अतीश दीपंकर यांची कथा थोड्याफार प्रमाणांत बरी आहे. पण त्यांच्या कथेतील शेवटच्या भागातील काही वाक्ये 'माणूस' च्या भविष्याला बाधक आहेत. 'अशा वाक्यांची छाटणी वेळेवरच झालेली चांगली' हे माझे प्रामाणिक मत आहे.

**कु. न. पैठणकर**
नंदिनी (मध्यप्रदेश)

# मार्ग

महानगरसीमा. शेकडो वेळा गाडीने, मोटारने या मार्गाने पूर्वी प्रवास केला होता पण याच वेळी या सीमारेषेवर मन असे रेंगाळल्यासारखे का करते आहे ? पाया-खालून काहीतरी सुटते आहे, आपण कशाला तरी अंतरतो आहोत, अशी शंका आताच का वाटू लागली ? यापुढचा मार्ग एकटयाचा, बराचसा अनिश्चित. काही प्रमाणात धोक्याचा, म्हणून ही भीती तर उभी राहिली नाही ! पण निदान आज-तरी भीतीचे कारण नव्हते. एकवेळची शिदोरी बरोबर घेतलेली आहे, पुढच्या वाटेवर बऱ्यापैकी १-२ हॉटेल्स आहेत आणि रात्रीचा मुक्काम तीस मैलांवर असलेल्या एका ओळखीच्या पेट्रोलपंपावर करायचा हे सकाळीं निघताना ठरलेले आहे. धोका, अनिश्चितता आणि त्यातून उद्‌भवलेली काळजी असली तर ती उद्या-पासून वाटायला पाहिजे. आताचा हा थरकाप काही वेगळाच आहे. का सुरक्षित विक्रमात बदल होणार ही जाणीव या क्षणी तीव्रतेने झाल्यामुळे आपण अस्वस्थ झालो ? नाही. दिनक्रम बदलेल, बदलावा म्हणून तर आपण मुद्दाम हा वेगळा प्रवास योजला. ही अवस्था अधिक सूक्ष्म दिसते. हातचे काहीतरी सुटत असल्याची, पण पळते दृष्टिपथातही आले नसल्याची ही वेदना असावी ? तसे हातचे पूर्ण सुटतही नव्हते. कारण पंधरा–वीस दिवसांत, फार तर महिनाभरात मी परतणार होतो. प्रवास जेवढा जमेल, झेपेल, आवडेल तेवढाच पायी होता. शरीराचे अकारण हाल करून घेण्याची मुळीच तयारी नव्हती. पण वीस वर्षे अंगवळणी पडलेली चाकोरी, आचारविचारांचा साचा थोडा बदलता आला तर पाहावा, प्रयत्नांना काही स्वतंत्र नवी दिशा, वेगळा अर्थ आणि आशय प्राप्त करून देता आल्यास पाहावे हा या पदयात्रेमागे जरूर उद्देश होता. निदान तशी प्रेरणा होती. ही प्रेरणा अपुरी राहिली, उद्देश असफल झाला तर ! आपली विघटना थांबवणारी, आपल्या साऱ्या शक्ती केंद्रीभूत करून आपल्या हालचालींत, प्रयत्नांत एक व्यापक सुसंगती निर्माण करणारी आपल्याला तळापासून वर उचलणारी एखादी जाणीव, एखादे सूत्र, एखादा आधार या पदयात्रेमुळे प्राप्त झाला नाही तर ! तर हा आटापिटा, श्रम वायाच जाणार. नुसती पायपीट होणार. यात्रा निष्फळच ठरणार.

..................................................................................

वास्तविक सगळे सुरक्षित पार पडत गेले असते तर या वेळी मला असे पंधरा-वीस दिवस घराबाहेर काढताही आले नसते. पुण्याच्या 'माणूस प्रतिष्ठान'च्या

# श्री. ग. मा.

विहिरीचा उद्घाटन सोहळा याच सुमारास केव्हातरी करण्याचे ठरत होते. पाडवा म्हणा, शिवजयंती म्हणा, पण विहिरीचे काम ठराविक मुदतीत पुरेच होऊ शकले नाही. दिवाळीच्या पाडव्याला कामाला सुरुवात झाली. दोन महिने काम अगदी नेटाने झाले. नाताळच्या सुटीत विद्यार्थ्यांचा श्रमसप्ताहाचा कार्यक्रम योजला, तोही अपेक्षेपेक्षा जास्तच यशस्वी ठरला. पण पुढे कामाचा वेग मंदावला. कारणे दोन. एक : सुरुवातीस लागलेले पाणी बरेचसे आटले व नवीन झरेही लागले नाहीत. त्यामुळे कामावरच्या मजुरांचा, जमिनीच्या मालकमंडळींचा उत्साहही थोडा ओसरला. दोन : शेतीचा हंगाम सुरू झाल्यामुळे विहिरीवर काम करणाऱ्या संचाची पांगापाग झाली. बाहेर अधिक रोजगार मिळत असल्याने माणसे मिळेनाशी झाली. हे काम ठेकेदाराला देऊन व्याप व त्रास वाचवावा असे सुरुवातीपासूनच अनुभवी लोकांचे म्हणणे होते. पण केवळ विहीर खणून देणे एवढाच ' प्रतिष्ठान 'च्या कार्यामागचा उद्देश नव्हता. अन्नोत्पादनवाढीला हातभार लावण्याबरोबरच छोटा शेतकरी व शेतमजूर यांच्याशी प्रत्यक्ष संबंध यावा, त्यांच्या स्थितीचे आकलन व्हावे, त्यामुळे ग्रामीण जनतेचा व शहरी सुशिक्षितांचा श्रमाचा व बुद्धीचा तुटलेला दुवाही जोडण्यास मदत व्हावी असे अनेक उद्देश या प्रकल्पामागे होते. नाहीतर विद्यार्थ्यांचे तसे महाग ठरलेले शिबिर योजण्याचे काय कारण होते ! विद्यार्थी हौसेने आले, तळमळीने आले, त्यांनी कामही उत्तम केले. पण त्यांच्या येण्याजाण्याचा खर्चच कामाच्या किंमतीपेक्षा जास्त होणार हे उघड दिसत असूनही हा कार्यक्रम योजला तो वरील सामाजिक उद्देश डोळ्यांसमोर होते म्हणूनच. हा श्रमसप्ताहाचा कार्यक्रम पूर्ण यशस्वी ठरला याचा एक पुरावा म्हणजे कार्यक्रम संपल्यावर विहिरीवर काम करणाऱ्या अडाणी मजुरांनाही चुकल्याचुकल्यासारखे वाटू लागले. काही दिवस करमेनासे झाले आणि विद्यार्थ्यांनीही कबुली दिली, काम थ्रिलिंग होते. सुप्याला, काहीतरी नवीन पाहायला, अनुभवायला मिळाले.'

विहिरीचे काम ठरल्याप्रमाणे पूर्ण झाले असते तर या उन्हाळी सुटीत एखादा वेगळा कार्यक्रम सुपे–भागात पुन्हा योजलाही असता; पण वरच्या दोन अडचणींच्या जोडीला तिसरी आणखी एक अडचण उभी राहिली. वीस–एकवीस फूट खोदाई झाल्यावर खडक इतका कठीण लागू लागला, की तयार गड्यांनाही साध्या सुरुंगाने तो निघेना. मग ब्लास्टिंग मशीनची योजना. सरकारी शेतकी खात्याशी संबंध.

थोडीफार दिरंगाई. याहीपेक्षा काळजी वाटू लागली अनिश्चित पाणीपुरवठ्याची. एवढे अवघड खोदकाम करून मूळ ठरलेल्या बजेटपेक्षा खर्च वाढवून शेवटी विहिरीला पाणी लागणार की नाही ! आणि लागले तरी किती ! किती एकर जमीन या पाण्यावर भिजू शकेल ! हा सगळा परिसरच दुष्काळी. आसपासच्या ब-याचशा विहिरी उन्हाळ्यात नेहमीच कोरड्या असतात. मग एकाच विहिरीवर खूप खर्च वाढविणे कितपत योग्य आहे ? त्यापेक्षा छोट्या छोट्या पावसाळी विहिरींची योजना अशा दुष्काळग्रस्त भागासाठी अधिक उपयुक्त ठरणार नाही का ! शेवटचा एक पाऊस झाला नाही तर छोट्या शेतकऱ्याची हातची पिके जातात असा या भागाचा नेहमीचा अनुभव, मग पावसाळी विहिरीमुळे तो हे पीक तर वाचवू शकेल ! बारमाही बागाईत नाही तरी उपासमार तर टळेल ! साठवण म्हणून त्याला अशा पावसाच्या पाण्याने भरणाऱ्या छोट्या छोट्या विहिरींचा खूप उपयोग होऊ शकेल असे वाटते; किंवा दुष्काळी भागाच्या पाण्याची, जमिनीची शास्त्रशुद्ध पाहणी करून या भागासाठी योग्य अशी काही वृक्षयोजनाही आखता येईल. या वृक्षारोपणासाठी व संवर्धनासाठी अवश्य असणारा पाण्याचा साठा म्हणूनही या छोट्या पावसाळी विहिरी चांगले काम देऊ शकतील. असे अनेक पर्याय ' प्रतिष्ठान 'च्या विहिरीच्या कामाच्या अनुषंगाने डोळ्यांसमोर येतात. यावर साकल्याने, सातत्याने विचार व्हायला हवा, विधायक चळवळच यासाठी उभारावी लागेल. नाहीतर दर दोन वर्षाआड एक वर्ष दुष्काळाचे उजाडते, सरकार घाईघाईने दुष्काळी कामे काढते, ती वर्ष–सहा महिन्यांतच वाहून जातात, पुन्हा दुष्काळ–पुन्हा कामे—हे चक्र काही थांबत नाही. तात्पुरत्या उपायांनी व दुष्काळ पडल्यावर केलेल्या आरडा-ओरडीने हा प्रश्न कधीही सुटणार नाही. दुष्काळ कायमचा हटविण्याची प्रतिज्ञा हवी, क्षेत्रनियोजनाची व्यापक शास्त्रीय दृष्टी हवी आणि लोकमताचा पाठिंबा हवा तरच महाराष्ट्राच्या व देशाच्याही पाचवीला पुजलेला दुष्काळाचा प्रश्न दहा–पंधरा वर्षांत निकालात निघेल. सुपे-विभागाचे असे नियोजन होऊ शकेल का ? हा विचार तेथील काही कार्यकर्त्यांसमोर बोलून ठेवला आहे. ' माणूस प्रतिष्ठान 'च्या एकट्याच्या बळावर हे कार्य होणे अर्थातच अशक्य आहे. पण या कार्याला महत्त्व देणाऱ्या काही खासगी किंवा निमसरकारी संस्थांनी एकत्र येऊन, सरकारशी विचार-विनिमय करून असे क्षेत्र संयोजनाचे प्रयोग हाती घेणे निकडीचे आहे, असे जरूर वाटते. ' माणूस प्रतिष्ठान ' यातील आपला वाटा उचलायला केव्हाही सिद्धच आहे.

पण या पुढच्या गोष्टी आहेत. तूर्त हाती घेतलेले विहिरीचे काम पूर्ण करणे, निदान पावसाळी विहिरीचे उद्दिष्ट गाठणे अवश्य आहे. पंचवीस फूट खोल विहीर खणून झालीच आहे. या पावसाळ्यात एवढ्या साठवणाने गरज भागते असे दिसून आले तर उत्तमच. साठा कमी पडतो असे वाटले तर पावसाळ्यानंतर पुन्हा काम सुरू करता येईल. कुठे थांबायचे यासाठी तज्ज्ञ आहेतच. शिवाय ' प्रतिष्ठान 'चे या

विहिरीसाठी ठरलेले बजेटही... !

आता प्रश्न आहे ' माणूस प्रतिष्ठान 'चा या पावसाळ्याअखेरचा — येत्या चार महिन्यांतला — कार्यक्रम काय ! सुप्याला काम नाही, मग जिकडे काम आहे, सुप्याच्या धर्तीचेच काम आहे, तिकडे ' माणूस प्रतिष्ठान ' आपला मोर्चा का वळवीत नाही ! ' माणूस 'च्या असंख्य वाचकांनी बिहारचा निर्देश केला आहे. ' माणूस प्रतिष्ठान 'ने आपल्या शक्तीच्या प्रमाणात या तातडीच्या व निकडीच्या कार्यातील आपला वाटा उचलावा अशी आग्रहाची सूचना करणारी अनेक पत्रे गेल्या काही दिवसांत ' माणूस 'कडे येत होती. पण एकंदर बिहारसाठी लागणाऱ्या किमान निधीच्या मानाने सुप्याच्या विहिरीचा खर्च भागवून शिल्लक राहणारा ' माणूस प्रतिष्ठान 'चा निधी अगदीच किरकोळ आहे. वाचकांना व सर्वसामान्य जनांना आवाहन करून ' माणूस प्रतिष्ठान 'कडे देणगी वा मदतरूपाने नवा निधी गोळा करावा तर या सार्वजनिक पैशाचा किमान हिशेब वगैरे व्यवस्थित ठेवण्यासाठी लागणारी कार्यालयीन यंत्रणा ' माणूस 'कडे नाही. अशा अवस्थेत हा निधी उभा करण्याची व बिहारसाठी त्याचा व्यय करण्याची अवघड जोखीम ' माणूस 'ने स्वीकारावी की नाही, यावर कार्यालयात बरीच भवती न भवती सुरू होती. सर्वांच्या आधी, आपला खास प्रतिनिधी पाठवून ' माणूस 'ने बिहारविषयीचे आपले वृत्तपत्रीय प्राथमिक कर्तव्य पार पाडलेले होते—याबद्दल कौतुकादराची शेकडो पत्रे वाचकांकडून आलेली होती. अधिक जबाबदारी उचलावी की नाही याबाबत मतभेद होते. मधूनच सुप्याच्या श्रमसप्ताहात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांकडून निरोपही येत होते, ' उन्हाळ्याच्या सुटीसाठी काय कार्यक्रम योजता आहात ! बिहारसाठी काम करण्याची इच्छा आहे. परीक्षा संपल्याबरोबर येतो आहोत. '

पंचाईत होती ! युवकांची शक्ती संयोजित करणे किती अवघड असते याचा थोडाफार अनुभव श्रमसप्ताहात घेतलेला होता. त्यांच्या उसळत्या रक्ताला, साहसी वृत्तीला वाव राहील असा कार्यक्रम हवा. त्यांच्या स्वाभाविक चंचलतेने कार्यहानी होणार नाही याकडे पाहावे लागते. वातावरण आनंदी हवे. शेवटपर्यंत सर्वांचा उत्साह टिकून राहिला पाहिजे. बिहार लांब आहे तोवर ठीक. तेथे गेल्यावर भाषेची अडचण जाणवते, हवामान सोसवत नाही, स्वच्छता राखता येत नाही, खाण्याचेच काय, पिण्याच्या पाण्याचेही हाल होतात. ओरिसात ग्रामदान पुनर्निर्माण कार्यासाठी देशातील विविध भागांतून जमलेल्या शेकडो ध्येयवादी, पदवीधर तरुण कार्यकर्त्यांची मानसिक अवस्था मी जवळून पाहिली होती. केवढी उच्च स्वप्ने उराशी बाळगून ते तेथे आले होते ! आणि महिनाभरातच तेथील गोंधळाला कंटाळून पार मरगळून गेले बिचारे ! तशीच अवस्था आपल्या विद्यार्थ्यांची होऊ नये ! कारण छायाचित्रे पाहून व वर्णने वाचून दुष्काळाचे एक भयानक भेसूर चित्र कल्पनेने रेखाटलेले असते व बिहारात गेल्यावर उघड्या डोळ्यांना प्रथम वस्तुस्थिती दिसते

ती धान्याच्या काळचा बाजाराची, राजकारण्यांच्या सत्तास्पर्धेची, सुशिक्षितांच्या उदासीनतेची, विद्यार्थ्यांच्या दंगलखोरीची, शहरांच्या चैनबाजीची. ‘ माणूस ’मधील वार्तापत्रे वाचल्यावर बिहारमध्ये ‘ पाहणी ’ करून आलेले एक नामवंत पत्रकार मला म्हणालेदेखील, “ तुमच्या प्रतिनिधीने लिहिले आहे तेवढा दुष्काळ मला काही कुठे दिसला नाही. ” बरोबरच आहे. सुखसोयी असणाऱ्या ठिकाणी आरामशीर वाहनांतूनच त्यांनी प्रवास केला तर दुष्काळ त्यांना दिसणार कसा ? दोन्हीही चित्रे वास्तवतेला धरूनच आहेत. चैन, काळाबाजार, आळस, सत्तास्पर्धाही आहे आणि भूक–भूक–भूकही आहे. जो कार्यकर्ता केवळ भूकनिवारण कार्याला जातो त्याला हे दुसरे काळे चित्र पाहून हादरा बसतो. ‘ कशासाठी आपण जीव धोक्यात घालून, हालअपेष्टा सोसत येथे राबायचे ?’ असा त्याला प्रश्न पडतो आणि निराश होऊन, बधीर होऊन, संशयात्मा बनून तो वाटेकडे डोळे लावून बसतो. आपल्या विद्यार्थ्यांच्या उत्साहाची अशी परवड होऊ नये, त्यांच्या शक्तीचा असा अपव्यय, त्यांच्या भावनांचा असा अनादर आपल्याकडून होऊ नये, अशीही टोचणी होतीच.

पण महिन्याभराचा अवधी होता विचार करायला. मेच्या पहिल्या आठवड्यात विद्यार्थी मोकळे होणार ! तोपर्यंत जरा भटकून तर येऊ ! ‘ माणूस प्रतिष्ठान ’च्या उद्दिष्टांशी सुसंगत व युवकांना प्रेरक असा एखादा कार्यक्रम योजता आला तर उत्तमच ! नाहीतर आपले ‘ अपरोक्ष ’ काम चालू आहे तेवढ्यावरच तूर्त समाधान !

अरे हो हो हो ! पण ही गाडी चालली आहे कुठे ? महानगराची सीमा कुठे, ‘ माणूस प्रतिष्ठान ’ कुठे, बिहार कुठे, विद्यार्थी कुठे ! आता थांबवलेली बरी. शिदोरीची वेळ झाली आहे. उजव्या हाताला शेतात, रस्त्याच्या कडेला विहीरही आहे. फक्त समोरून येणाऱ्या मुलाला विचारून घेऊ, या विहिरीचे पाणी पिण्यासाठी कसे आहे !

घर सोडल्यापासून उच्चारलेले पहिले शब्द ! साडेचार तासांचे मौन......पण या वेळी कोंडल्यासारखे मुळीच वाटले नाही... □


घरबसल्या मराठीतून इंग्रजी प्राथमिक व्याकरण लहानांनी शिकावे कसे व मोठ्यांनी शिकवावे कसे ? माहिती–पत्रक मागवा.

**ॐ चैतन्य पोस्टल ट्यूशन्स**

**पो. बॉ. १६७६० शीव, मुंबई–२२**

भाषाप्रश्न

# खंबीर भूमिका केव्हा घेणार ?

आचार्य कृपलानी आणि प्रा. एन्. जी. रंगा लोकसभेवर निवडून आले आहेत. गेल्या फेब्रुवारीमध्ये पार पडलेल्या निवडणुकींत हे दोन्ही नेते पराभूत झाले होते. त्यानंतर दोन महिन्यांच्या आतच गुणा आणि श्रीकाकुलम येथे पोटनिवडणुका होऊन त्यांत हे दोघे मातबर विरोधी नेते विजयी झाले. गंमतीची गोष्ट अशी की १९६२ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीतही असाच प्रकार घडला होता. कृपलानी व प्रा. रंगा त्या वेळी पराभूत झाले; परंतु नंतरच्या पोटनिवडणुकीत त्यांनी विजय मिळविला. म्हणूनच सार्वत्रिक निवडणूक हरणारे, परंतु पोटनिवडणूक हमखास जिंकणारे असा त्यांचा विनोदाने उल्लेख करण्यात येतो. गुणा मतदारसंघामध्ये कॉंग्रेसने श्रीमती सुभद्रा जोशी या जुन्या आणि मुरब्बी महिला–उमेदवारास उभे करून कृपलानी यांना पाडण्याचा पराकष्ठेचा प्रयत्न केला. सुभद्रा जोशी या केंद्रीय कॉंग्रेस वर्तुळातील डाव्या गटाच्या प्रमुख सदस्या आहेत. त्यांचा जनसंघावर व स्वतंत्र पक्षावर विशेष राग. १९६२ च्या निवडणुकीत त्यांनी जनसंघ नेते श्री. अटलबिहारी वाजपेयी यांचा पराभव केला होता व तेव्हापासून जनसंघासंबंधी कुचेष्टेने बोलण्यात सुभद्राबाईंना मोठा आनंद वाटतो. गेल्या फेब्रुवारीतील सार्वत्रिक निवडणूक होण्यापूर्वी संसद–भवनाच्या सभागृहात सुभद्राबाई भेटल्या असताना मी विचारले होते, " या वेळीही वाजपेयीच आपल्याविरुद्ध उभे आहेत ? "

" या वेळीही ते पराभूत होतील "—असे त्यांनी मोठ्या आत्मविश्वासाने सांगितले होते. परंतु १९६७ हे वर्ष १९६२ नव्हे हे या अहंकारी बाईंना मतदारांनी समजावून सांगितले. परंतु या पराभवाने त्या नाउमेद झाल्या नाहीत. गेल्या मार्चमध्ये त्या पुन्हा भेटल्या असताना म्हणाल्या, " मी लवकरच लोकसभेत येत आहे याची

खात्री बाळगा." त्या वेळी त्यांच्या डोळ्यांपुढे गुणा मतदारसंघ होता. कृपलानी आपल्याविरुद्ध टक्कर देऊ शकणार नाहीत, अशी त्यांची धारणा होती; परंतु जे बलरामपूरमध्ये घडले तेच गुणामध्येही घडले. सर्व विरोधी पक्षांच्या एकजुटीपुढे काँग्रेसचा टिकाव लागू शकला नाही. सव्वा लाखाहून अधिक मतांनी सुभद्रा जोशी पराभूत झाल्या. एका अर्थाने कृष्ण मेनन प्रकरणाची पुनरावृत्ती झाली. फरक एवढाच की मेनन यांनी एकाच मतदारसंघात दोनदा पराभव स्वीकारला तर सुभद्रा जोशी या दोन निराळ्या मतदारसंघांत पराभूत झाल्या. या दुसऱ्या निवडणूक-निकालानंतर त्यांची भेट झालेली नाही. पण जेव्हा केव्हा भेट होईल तेव्हा, मला खात्री आहे की, त्या मेनन यांच्याप्रमाणेच पुन्हा पोटनिवडणूक लढविण्याचा निर्धार व्यक्त केल्यावाचून खचित राहणार नाहीत. कोठे थांबावे हे जाणून घेण्यास मेनन यांच्याप्रमाणेच सुभद्रा जोशी यांचीही तयारी नाही.

गेल्या आठवड्यात निरनिराळ्या राज्यांतील विधानसभांच्या पोटनिवडणुकांचे निकाल जाहीर होऊन उत्तर भारतात काँग्रेसची प्रतिष्ठा किती खालावली आहे याचे पुन्हा एकदा दर्शन घडले. बिहारमधील बागोदर मतदारसंघातून जनक्रांतिदलाचे डॉ. वसंतनारायण सिंग निवडून आले. महामाया-मंत्रिमंडळात ते वनमंत्री आहेत. त्यामुळे या मंत्र्यांचा पराभव करण्यासाठी दुबळ्या बिहार काँग्रेसने केविलवाणा प्रयत्न करून पाहिला. परंतु बिहारी मतदार काँग्रेसच्या भ्रष्टाचारी राजवटीला इतका विटला आहे की काँग्रेसवाल्यांच्या आमिषांनाही तो बळी पडू शकला नाही. ही झाली बागोदर मतदारसंघातील कथा. किशनगंजमधून प्रजासमाजवादी पक्षाच्या श्रीमती सुशील कपूर निवडून आल्या. ओरिसातील भुवनेश्वरची पोटनिवडणूकही बरीच गाजली. कारण तेथे जनकाँग्रेसने डॉ. हरेकृष्ण मेहताब यांच्या पत्नींना उभे केले होते. मेहताबांच्या पुढाकारामुळच ओरिसातून पटनाईक-मित्र-त्रिपाठी प्रभृतींच्या सत्तेच्या (आणि सत्तेपाठोपाठ येणाऱ्या लाभाच्या) मिरासदारीला सुरुंग लागला. त्यामुळे मेहताबांचा पराभव करण्यासाठी पटनाईकांनी कंबर कसली; परंतु त्यांच्या भ्रष्टाचाराचा डंका एवढ्या मोठ्याने वाजत आहे की सौ. सुभद्रा मेहताब यांना ही निवडणूक जिंकण्यास फारसे प्रयास पडले नाहीत.

## हुकुमसिंगांचे डावपेच

राजस्थानमध्ये अखेर सुखाडियाशेठजींचे मंत्रिमंडळ स्थापन झाल्यामुळे सुखावलेल्या काँग्रेसजनांना या चार-पाच निकालांमुळे धक्का बसणे साहजिक आहे. राजस्थानमध्ये आपले मंत्रिमंडळ अधिकारारूढ झालेच पाहिजे, असा काँग्रेस-श्रेष्ठांनी चंग बांधला व त्या आधारे संयुक्त दलाचे वीस सदस्य फोडण्यात सुखाडिया यशस्वी झाले.

परंतु या सर्व प्रकरणात संपूर्णानंद आज नाहक बदनाम झाले. त्यांच्यासारख्या पंडिताच्या अंगी हुकुमसिंगांसारखी चतुराई नव्हती. त्यांनी आपला निर्णय चटकन

जाहीर केला. उलट हुकुमसिगांनी या वीस सदस्यांचे जाबजबाब अशा कौशल्यान घेतले की त्यांच्यावर पक्षपाताचा आरोप करण्यास महारावळ लक्ष्मणसिंगही धजावू शकले नाहीत. हुकुमसिंग ज्या खुबीने सुखाडियाशेठजींच्या पाठीशी उभे राहिले ती खुबी संपूर्णानंदांना माहीत नव्हती. शेवटी दीड-दोन महिन्यांनंतर का होईना, राजस्थानमध्ये काँग्रेस मंत्रिमंडळ सत्तारूढ झाले. निवडणुकीनंतरची पहिली आनंद-दायी घटना असे याबाबत जंतरमंतर रोडवरच्या काँग्रेस-कचेरीत बोलले जात आहे. परंतु हा आनंद पोटनिवडणुकींच्या निकालांमुळे फार काळ टिकू शकला नाही. एवढे सारे झाल्यानंतर काँग्रेस-नेते काही शिकण्याच्या मनःस्थितीत आहेत अशी जर कोणाची समजूत असेल तर ती मात्र साफ चुकीची आहे. वस्तुतः, या सर्व पोटनिवडणुकांमध्ये मतदारांनी ' काँग्रेस नको ' असे स्पष्टपणे सांगितले असतानाही विरोधकांवर वाटेल ते आरोप करून, काँग्रेस-श्रेष्ठ आपल्या पराभवाचे खापर त्यांच्यावर फोडत आहेत. सर्वसामान्य नागरिकाला गेल्या वीस वर्षांतील काँग्रेस पक्षाच्या अहंमन्य व भ्रष्टाचारी राजवटीचा इतका उबग आला आहे. म्हणूनच तो कोठेही सरळ सामना होवो, काँग्रेसविरोधी उभा ठाकलेला उमेदवार कोणत्या पक्षाचा याचा विचार न करता, त्याच्या पेटीत मत टाकतो. हे ' भितीवरचे लिखाण ' वाचण्यास काँग्रेसने नकार दिला तर त्याला कोण काय करणार ?

या पोटनिवडणुकांच्या निकालावर चर्चा होत असताना दिल्लीत भरलेल्या शिक्षणमंत्र्यांच्या बैठकीकडे काहीसे दुर्लक्षच झाले. डॉ. त्रिगुण सेन यांच्यासारखा शिक्षणतज्ज्ञ व बनारस विद्यापीठाचा कुलगुरू शिक्षणमंत्रिपदावर आरूढ झाल्यानंतर ही बैठक भरत असल्यामुळे आतापर्यंत दुर्लक्षित झालेल्या शिक्षणासारख्या महत्त्वाच्या प्रश्नाबाबत खऱ्या अर्थाने राष्ट्रीय धोरण यापुढे स्वीकारले जाईल व त्या दृष्टीने ही शिक्षणमंत्र्यांची बैठक महत्त्वाची ठरेल अशी अपेक्षा होती. परंतु शिक्षणाच्या स्वरूपा-पेक्षा भाषेच्या प्रश्नालाच या बैठकीत महत्त्व मिळाले व त्यामुळे इतर प्रश्नांचा पुरेसा विचार होऊ शकला नाही. भाषेचा प्रश्न म्हणजे हिंदी ही दुवा-भाषा माना-वयाची की नाही हाच खरा प्रश्न. गेली कित्येक वर्षे त्रिभाषा-सूत्राचा पुरस्कार करण्यात येत आहे. या सूत्रानुसार प्रत्येक विद्यार्थ्याने मातृभाषा, इंग्रजी व हिंदी या तीन भाषांचा अभ्यास करावा, अशी योजना करण्यात आली आहे. परंतु बंगाल व तामीळनाड या राज्यांचा हिंदी भाषेला एवढा विरोध आहे की त्यांनी हिंदी व इंग्रजी या शब्दसंहितेऐवजी हिंदी वा इंग्रजी असा बदल सुचविला आहे. आधुनिक ज्ञानविज्ञानाशी परिचय होण्याच्या दृष्टीने इंग्रजी भाषेचा अभ्यास होणे आवश्यक आहे याबद्दल कोणाचेच दुमत होणार नाही. त्याचप्रमाणे सर्व शिक्षण आज ना उद्या प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या त्याच्या मातृभाषेत मिळणे आवश्यक असल्याने मातृभाषेच्या अभ्यासाला चालना मिळणे अपरिहार्य ठरते. परंतु, आधुनिक ज्ञानविज्ञानसंपन्न इंग्रजी काय किंवा तामीळ, बंगाली, मराठी, गुजराती आदी प्रादेशिक भाषा काय

सबंध देशाची दुवाभाषा म्हणून उपयोगी पडणे शक्य नाही. देशांतील बहुसंख्य लोक जी भाषा बोलत आहेत तीच दुवा-भाषा म्हणून स्वीकारणे इष्ट ठरते. या दृष्टीने पाहता प्रत्येक भारतीयाला हिंदी भाषेचा किमान परिचय' असावयास हवा. परंतु स्वभाषेच्या अतिरेकी प्रेमामुळे व हिंदीच्या पराकोटीच्या द्वेषामुळे बंगाली व तामीळ भाषिक लोक इंग्रजी हीच दुवा-भाषा म्हणून राहावी असे सांगू लागले आहेत. हिंदी ही बंगाली किंवा तामीळइतकी प्रगत नाही म्हणून आम्ही हिंदीचा अभ्यास सक्तीचा करण्यास विरोध करीत आहोत, असे त्यांचे प्रतिपादन असते. बंगाली माणसाला आपली भाषा इतर सर्व भारतीय भाषांपेक्षा इतकी श्रेष्ठ वाटते की आम्ही बंगाली लोक व आमची भाषा प्रगत आणि इतर सारा भारत व भारतीय भाषा मागासलेल्या असे अगदी सहज बोलतानाही सांगून जातो. एकदा कलकत्त्यामध्ये एका बंगाली पत्रकाराशी चर्चा करीत असताना तो चटकन म्हणून गेला, "आम्ही बंगाली आहोत आणि तुम्ही सारे भारतीय आहात. भारताने पाहिजे असल्यास हिंदीचा स्वीकार करावा. ते बंधन आम्ही कधीही मान्य करणार नाही."

## 'भारताचे हे आक्रमण....'

मद्रास राज्यात सध्या द्रविड मुन्नेत्र कळघमचे सरकार अधिकारावर आले असून पहिल्यापासून तेथे अस्तित्वात असलेला हिंदीद्वेष आता पद्धतशीरपणे पोसला जात आहे. हिंदी भाषेच्या बाबतीत बोलताना मनोहरन यांच्यासारखा 'कळघम'चा मान्यवर नेता चटकन बोलून जातो, "भारताचे हे आक्रमण आम्ही कधीही सहन करणार नाही."

शिक्षणमंत्र्यांच्या परिषदेत बंगाल व मद्रास या राज्यांचा हिंदी-विरोध प्रकर्षाने जाणवला. त्यामुळेच मूळच्या त्रिभाषा-सूत्राऐवजी द्विभाषा-सूत्राचा (मातृभाषा व दुसरी एक भाषा) या दोन राज्यांकडून पुकारा करण्यात आला. दुर्दैवाची गोष्ट अशी की, त्रिगुण सेन यांच्यासारख्या व्यासंगी शिक्षणतज्ज्ञानेही भारतीय एकात्मतेचा विचार करण्याऐवजी आपला हिंदी-विरोध प्रदर्शित केला. प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी व उपमहामंत्री श्री. मोरारजी देसाई यांनी हा दृष्टिकोन चुकीचा कसा आहे, हे आपल्या भाषणात विशद करून सांगितले. परंतु तामीळ व बंगाली भाषिकांच्या तीव्र विरोधामुळे हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न तसाच अनिर्णीत राहिला. हिंदीसारखी एखादी भारतीय भाषा जोपर्यंत आपण दुवा-भाषा म्हणून निश्चित रीतीने स्वीकारत नाही तोवर आपल्या राष्ट्रीय गालथानपणाचे कसे प्रदर्शन होते याचे एक उदाहरण काही दिवसांपूर्वी पाहावयास मिळाले. दोन रशियन पत्रकार भारताच्या दौऱ्यावर आले असताना त्यांनी मुंबईमधील आपले एक भाषण हिंदी भाषेत केले. परंतु सभेच्या अध्यक्षांना हिंदीचा गंध नसल्यामुळे त्यांना इंग्रजीमध्य त्यांचे आभार मानले. "हिंदी ही तुमची भाषा असताना तुमच्यापैकी बऱ्याच जणांना तीत आभारप्रदर्शक चार-पाच वाक्येही बोलता येत नाहीत ही मोठी

आश्चर्याची गोष्ट आहे," अशी प्रतिक्रिया त्या रशियन पत्रकारांनी व्यक्त केली. परंतु ही हास्यास्पदता कायम राहिली तरी चालेल, परंतु आम्ही हिंदीचा दुवा-भाषा म्हणून स्वीकार करावयास तयार नाही ही हट्टाग्रही वृत्ती बंगाल व मद्रास राज्यांनी पहिल्यापासून प्रदर्शित केली आहे. त्यांचा हा शब्दसंकुचित वृत्तीचा दृष्टिकोन बदलण्याचे सामर्थ्य आपल्या केंद्र सरकारात नाही. इतकेच नव्हे तर त्रिगुण सेन यांच्या कारकीर्दीत या विरोधाला सरकारी मान्यतेचे खतपाणी मिळण्याचा संभव निर्माण झाला आहे. महाराष्ट्र, गुजरात आदी राज्यांच्या शिक्षणमंत्र्यांनी प्रत्येक भारतीय विद्यार्थ्याने हिंदीचा किमान अभ्यास करणे राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने किती आवश्यक आहे हे या बैठकीत प्रतिपादन केले. परंतु त्यांच्या भाषणांना पुरेशी प्रसिद्धी मिळाली नाही. इतर काही भारतीय भाषांच्या तुलनेने हिंदी अप्रगत आहे, असे म्हणणे वेगळे; आणि तिला विरोध करण्यासाठी इंग्रजी भाषा आपली आहे अशी स्वाभिमानशून्य वृत्ती असणे निराळे. गेली अनेक वर्षे या हिंदीच्या प्रश्नावरून रण माजले आहे. परंतु केव्हातरी केंद्र सरकारला त्याबाबत खंबीर भूमिका घ्यावीच लागणार आहे. तूर्त तरी हा प्रश्न विचाराधीन आहे एवढे सांगण्यावरच समाधान मानण्यात येत आहे.

सदाशिव पेठकर


तुमची जिव्हाळ्याची बँक

दि

बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

(११७७ बुधवार पेठ, पुणे २)

आपल्या ११६ शाखांनिशी आपल्या सेवेस सदैव सिद्ध. विदेश-विनिमय व एक्झिक्युटर आणि ट्रस्टी सेवा यांच्यासह बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

*अधिक माहितीसाठी आपल्या नजीकच्या शाखेला भेट द्या.*

चि. वि. जोग
*जनरल मॅनेजर*

शं. ल. किर्लोस्कर
*अध्यक्ष*

समीर

# विचार वारे

## □ जनता आणि पोलीस

" पोलिसांचा दंगा " नावाची अभूतपूर्व घटना भारताच्या राजधानीत नुकतीच घडली, तेव्हा पोलिसांनी जनतेशी कसे वागावे आणि जनतेचा पोलिसांच्या बाबतींत काय दृष्टिकोन हवा याबाबत एका परदेशी पोलीस अधिकाऱ्याने दिल्लीत प्रकट केलेले विचार खूपच औचित्यपूर्ण म्हटले पाहिजेत. फ्रान्सच्या पोलीस खात्यातील एक उच्चाधिकारी विलेतोर्ते हे टोकियोहून पॅरिसला परतताना गेल्या आठवड्यात नव्या दिल्लीला थांबले तेव्हा त्यांच्या मनात पहिला विचार आला तो म्हणजे, 'पॅरीसच्या ट्रॅफिक पोलिसाला दिल्लीच्या रहदारीचा घोटाळा पाहून काय वाटेल हे पाहणे उद्बोधक ठरेल." दिल्लीत बैलगाडीपासून मोटारीपर्यंत १३ निर-निराळ्या प्रकारची वाहने आहेत. दुसरा विचार : दिल्लीच्या ट्रॅफिक पोलिसांची संख्या आवश्यकतेच्या मानाने खूपच कमी वाटते. हिंदुस्थानांतील एकूण पोलि-सांच्या बाबतीत हीच परिस्थिती आहे असे वाटते. मात्र जे अधिकारी भेटले ते चांगले होते, पण त्यांची संख्या पुरेशी आहे की नाही हे मला सांगता येणार नाही. तिसरा विचार : दिल्लीत रहदारीची समस्या फार मोठी आहे याचे कारण हे शहर होते त्याच्यापेक्षा चौपट वाढले आहे असे म्हणतात. उलट युरोपात शहरांची वाढ जास्तीत जास्त ५० टक्क्यांहून अधिक झालेली नाही.

रहदारी सांभाळणे हे पोलिसांचे एक मोठे काम आहे. निदान पाश्चिमात्त्य देशांत तरी " रहदारी ही युरोपातली प्रमुख समस्या आहे. " जनतेचे ट्रॅफिक पोलीस खात्याबद्दलचे मत बदलणे व पोलिसाच्या " सामाजिक जबाबदारी " चे क्षेत्र वाढविणे या दोन गोष्टी आवश्यक आहेत. पण फक्त ट्रॅफिक पोलीसच का ? उत्तर : कारण लोक आता जास्त बाहेर हिंडतात व त्यांना एक माणूस सारखा दिसतो, तो म्हणजे ट्रॅफिक पोलीस. त्याच्याशीच त्यांचा जवळचा संबंध येतो.

पोलिसाबद्दलचे जनतेचे मत आणि पोलिसाची सामाजिक जबाबदारी या दोन गोष्टींचा अविभाज्य संबंध आहे. लोकांना पोलिसांच्याबद्दल विश्वास वाटला पाहिजे. " पोलीस हा आपला सर्वांत जवळचा मित्र आहे, असे लोकांना वाटले पाहिजे. तो कुठल्याही बाबतीत आपल्याला मार्गदर्शन करू शकेल असा त्यांना

भरंवसा वाटला पाहिजे." रस्त्यावर तो दिसला की सामर्थ्याची व विश्वासाची भावना निर्माण झाली पाहिजे, भीतीची नव्हे. युरोपातल्या ट्रॅफिक पोलिसांची ही एक मोठी समस्या आहे. "मोटार चालविणाऱ्याळा पोलीस दिसला की त्याच्या मनात फक्त शिक्षेचाच विचार येतो." पण फ्रान्समध्ये मात्र जनतेला कुठल्याही गोष्टीला विरोध करायची सवय असूनही लोक अडीअडचणीच्या वेळी कोणाकडे वळतात, तर पोलिसाकडे. जनतेचा एवढा विश्वास संपादन करता आला की पोलिसांना आपली सामाजिक जबाबदारी अधिक चांगली पार पाडता येईल. ती जबाबदारी म्हणजे समाजाला शिस्तपालन करायला लावणे.

## □ बातम्या की संगीत ?

हिंदुस्थानात रेडिओ ऐकणाऱ्या मंडळींना 'व्हॉइस ऑफ अमेरिका' रेडिओवर भारतीय संगीत ऐकायला आवडेल की अमेरिकेच्या बातम्या ? 'व्हॉइस ऑफ अमेरिका' चे आशिया विभागाचे प्रमुख विल्यम माइन हार्ट यांनी गेल्या आठवड्यात दिल्लीच्या भेटीत हा एक प्रश्न विचारला व त्याचे उत्तर स्वतःच दिले. बातम्या, त्याचप्रमाणे अमेरिकन श्रोता पाश्चिमात्त्य संगीतासाठी आकाशवाणी ऐकणार नाही, – "आणि यांत कुठल्याही रेडिओ–स्टेशनवर टीका करण्याचा माझा उद्देश नाही." सर्व जगातले रेडिओश्रोते सारखेच असतात. "मला सांगण्यात आले आहे की भारतीय श्रोते निराळे आहेत व आफ्रिकन तर गूढवादी आहेत." परंतु कुठल्याही लोकांना एखादा कार्यक्रम आवडतो किंवा आवडत नाही तेव्हा त्याचे कारण एकच असते. मनोरंजक कार्यक्रमापेक्षा माहितीपूर्ण कार्यक्रम अधिक ऐकला जातो. शिवाय शॉर्ट वेव्हवर वातावरणातला खडखडाट इतका येतो की संगीताचा रसास्वाद नीट घेता येत नाही. आकाशवाणीच्या कार्यक्रमांचा दर्जा चांगला असतो. पण आकाशवाणीवर जाहिराती सुरू झाल्या म्हणजे काय होईल ? उत्तर : "एकदा आर्थिक दृष्टिकोन आला की सर्वसामान्य अभिरुची लक्षात घेऊन कार्यक्रमांचा दर्जा जरा खाली आणावा लागेल."

अमेरिकेतली रेडिओ केंद्रे खाजगी मालकीची असतात. समजा, अमेरिकेच्या अध्यक्षांना रेडिओवर भाषण द्यायचे असले व रेडिओ केंद्राने त्यांना वेळ द्यायचे नाकारले तर ? उत्तर : "तर अध्यक्षांना भाषण करता येणार नाही !" – पण प्रक्षेपणाचा परवाना मिळणे बंद झाले तर रेडिओ-केंद्र बंद पडेल हे केंद्राला विसरून चालायचे नाही.

●

# एक कविता

समुद्राच्या कडेकडेने
रात्र खाली उतरत आहे
अस्ताव्यस्त वाळूवर
गूढ छाया पसरत आहे
मावळत्या प्रकाशाला
कातरता बिलगत आहे
सांजवेळ पाझरत आहे !
हृदयाच्या कंपनात
आज क्षितिज शांत आहे
तारकांच्या प्रतिक्षेत
थेंब थेंब गळत आहे
काळोखाच्या जहाजावर
क्षीण दिवा हलत आहे
सांजवेळ पाझरत आहे !
डोळयांतून जपलेले
नभ आता दुरावत आहे
श्वासांचे हळवे वादळ
पापणीत वितळत आहे
हरवलेले 'मी'पण
पुन्हा जवळ येत आहे
सांजवेळ पाझरत आहे !

—*गोविंद कुलकर्णी*

# आम्ही—

आम्ही नाटकी नाटकी
केले जन्माचे नाटक
आम्ही हसू आम्ही रडू
नाही सोयर–सुतक

—*ह. शि. खरात*

# आ स्वा द

सांजवेळ पाझरत आहे, या घटनेभोवती गोविंद कुलकर्णी यांनी एक कविता रचलेली आहे. प्रतीके किंवा कल्पना यांची गुंतागुंत किंवा दुर्बोधता कुठे आढळून येत नाही, ही अभिनंदनीय गोष्ट म्हटली पाहिजे. साऱ्या धूसर व गूढ वातावरणाला 'काळोखाच्या जहाजावर क्षीण दिवा हालत आहे' या वर्णनाने एकदम मध्यवर्ती बिंदू सापडतो. ते अधिक गोचर होते. डोळयांतून साठवलेले यापेक्षा डोळयांतून जपलेले नभ अधिक आपलेसे वाटते, जवळ येते. अंधार होऊन जेव्हा मनुष्य अंतर्मुख होतो तेव्हाच त्याचे स्वत्व त्याला सापडते. या दृष्टीने कवितेचा शेवट फार सार्थ ठरतो.

जीवनात मीलनाचा एखादा क्षण असा येतो की तो सतत येत राहावा अशी हुरहूर लागते; किंबहुना तेलाचा थेंब जसा पाण्यावर पसरतो त्याप्रमाणे हा क्षण सर्व जीवनभर पसरावा, असे वाटत राहते. हा क्षण आहे तर जीवनाला अर्थ आहे. हे सारे अवधूत भालेकर यांनी 'अधीर मी हवा असा' या कवितेत बहारदारपणे चित्रीत केले आहे. पंचचामर थाटाची जाती आणि यमकांत पुष्कळशी नियमबद्धता यामुळे कविता गेय झाली आहे. परंतु पहिल्या कडव्यात रमणीय



अनुभूतीचा नुसता भास चालेल हे कवी कसे म्हणतो कळत नाही ! कारण बाकी सर्व प्रत्यक्षानुभूतीचे वर्णन आहे. डोळ्यांत स्वप्न आहे. ते असावे हे म्हणणे युक्त ठरेल. कवितेतला सताल चढउतार कवितेला माधुरी देतो.

ह. शि. खरात यांच्या दोन कणिका संस्मरणीय ठरतील. एकात जग ही रंगभूमी आहे या कल्पनेचा पुरस्कार आहे तर दुसऱ्या कणिकेत प्रार्थना आहे. देवाला नव्हे प्रियतम व्यक्तीला ! यात मनासाठी योजलेले प्रतिमान शब्दांच्या चौकटीत ठीक वसविले आहे. दवात गीते घुमावी हे मात्र चमत्कारिक वाटते.

—*गोपीनाथ तळवलकर*

## अधीर मी हवा असा !

हवी अशीच यामिनी
हवा असाच गारवा
हवा असाच गोडसा
मला तुझाच भास, वा !
हवीस तू अशी इथे
हवा असाच चंद्रमा
हवा असाच लाजुनी
तुझ्या मुखास रक्तिमा !
हवा असाच शुभ्रसा
विलास याच कुंतली
हवी अशीच अंगुली
तुझी, करांत गुंतली !
हवा असाच संगती
सुगंध धुंद फुंदसा
हवा असाच मी सखे
तुझ्या करी, खुळा पिसा !
हवे असेच स्वप्न, या
मदीय रोज लोचना
अधीर मी हवा असा
तुझ्या मिठीत चुंबना !

—*अवधूत मालेकर*

## प्रार्थना—

माळ—मातीच्या मनात माझ्या
तुझे फुटू दे हिरवे-पाते
अन् डोळ्यांच्या दवांत माझ्या
तुझी घुमू दे आभाळ-गीते

—*ह. शि. खरात*

# "विशाखा, मी येतोय!"

वर्धेच्या किनाऱ्यावरील एका बाजूला असलेल्या शांत, प्रशस्त बंगलीच्या बैठकखोलीत बंगलीचे मालक आबासाहेब देशमुख आणि अमरावतीचे भाऊराव उमरावतीकर जवळजवळ गेल्या 'एक तासभर कुठल्यातरी चर्चेत गढून गेले होते. तासाभराच्या प्रदीर्घ चर्चेनंतर ते बाहेर आले तेव्हा दोघंही दिलखुलासपणे हसत होते. बाहेर येताच आबासाहेबांनी साद घातली, —

" अहो, ऐकलं का, आपल्या विश्वासचं लग्न पक्कं केलं आम्ही. पाव्हण्यांचं तोंड गोड करा आता. "

थोड्याच वेळानंतर भाऊरावांनी आबासाहेबांचा निरोप घेतला.

भाऊरावांची पाठ वळताच, ताईंनी प्रश्न टाकला, " सगळं पक्कं ठरलं का ?"

" हो ठरलं की ! विश्वासचं नशीब बाकी दांडगं आहे ! उमरावतीकरांची एकुलती एक लेक, दिसायला सुंदर, बी. ए. पास आणि शिवाय अतिशय हुशार—"

" पण देण्या-घेण्याचं वगैरे काय ठरलं, मी म्हणते ? "

" तेही काही विचारू नका. विश्वास भलताच लकी बुवा ! स्वतःची काळजी दूर तर केलीच बेट्यानं, पण आमचीसुद्धा ! अहो, बघता काय अशा ? सर्व इस्टेट विश्वासाच्या नावानं करणाराहेत ते, न् शिवाय पंचवीस हजार हुंडा. "

" काय पंचवीस हजार —! "

" धोऽऽका .... मामंजी .... इंजेऽऽक्शन ....
विश्वास .... त्यांऽऽच्या .... वर सूडाचा भाव
ठेवू नका .... उतार वयात त्यांना सोडू" ....
विशाखा अस्पष्टपणे बोलत होती आणि ....

## सुरेंद्र सोमण

" अहो, असतं एकेकाचं नशीब, बरं, हे बघा, मुहूर्त जवळचाच, म्हणजे पंधरा दिवसांवरचाच धरलाय. तेव्हा जरा घाईच करा. विश्वासला आजच तार करून बोलावून घेतो, म्हणजे झालं. "

" पंधरा दिवसांवर, म्हणजे खूपच घाई होणार नाही का ? शिवाय विश्वास नाही का मुलगी बघणार ?"

" सर्व काही व्यवस्थित होईल. आता मधेमधे उगाच नाही त्या शंका-कुशंका काढू नकोस. अशी सोन्यासारखी संधी घालवायला वरचेवर नसते मिळत, कळलं ? चला, घाई करा. आटपा. "

* * *

आबासाहेब देशमुख हे पुलगावातलं बडं प्रस्थ ! पन्नाशीकडे झुकलेला हा उंचापुरा आडदांड गृहस्थ खुशालचेंडू-प्रमाणं आपलं आयुष्य व्यतीत करीत होता. पूर्वायुष्यात जीवनातली सारी सुखं त्यानं यथेच्छ उपभोगली होती. ताई त्यांच्या सहधर्मचारिणी आणि विश्वास एकुलता एक लेक; पण आबासाहेबांचा जीव ह्या दोघांत फारसा कधी रमला नाही. इकडे-तिकडे भटक-भटकणारा तो जीव, कधी-मधी चुकून ताई–विश्वासच्या विश्वात येऊन जायचा ! आयुष्याच्या उतरणीला लागल्यावर मात्र अलीकडे आबासाहेब घरात रस घेऊ लागले होते. पण ह्या वेळपर्यंत परिस्थिती

पार पालटली होती. भपका वरवरचा राहिला होता. डोलारा अजूनही उभा होता निश्चित. पण तो आतून साफ पोखरला गेला होता. केव्हा कोसळेल ह्याचा काहीच नेम नव्हता ! हे सर्व लक्षात आलं आणि आयुष्यात अगदी प्रथमच आबासाहेबांना पश्चात्ताप झाला–आयुष्यात काहीही न केल्याचा ! आयुष्याची संध्याकाळ दृष्टिपथात आल्यावर काही करणंही त्यांना आता शक्य नव्हतं. आणि त्यामुळंच त्यांचं एकमेव आशास्थान आता बनलं होतं–विश्वास !

आणि विश्वास जीवनाचा डाव यशस्वीपणे खेळत होता. आबासाहेबांच्या गैर-हजेरीत विश्वासची जडण-घडण झाली होती ती ताईंच्या तालमीत ! अंगापिंडाची ठेवण मात्र त्यानं वडिलांपासून घेतली होती. त्यामुळे त्याच्या व्यक्तिमत्त्वाला वळण लागलं होतं, ते नीटस होतं, स्वच्छ होतं ! सर्वांना हवाहवासा वाटणारा विश्वास त्याच्या ताईंचा सर्वांत मोठा आधार होता.

* * *

" शतायुषी हो पोरा ! ऊठ. विश्वास, तुला एवढ्या तडकाफडकी का बोलावलं माहीत आहे ? आम्ही तुझं लग्न पक्कं केलंय्. होय, लग्न ठरवलंय तुमचं ! पंधरा दिवसांनीच मुहूर्त धरलाय् ! " नमस्कार करायला आलेल्या विश्वासला उठवून घेत, आबासाहेब एका दमात हे सारं बोलून गेले. आणि विश्वास दिङ्मूढ होऊन पाहत राहिला. नागपूरला तार मिळताच जेव्हा तो ताबडतोब पुलगावला यायला निघाला तेव्हा एकंदर प्रकार असा काही असेल असं त्याला स्वप्नातसुद्धा वाटलं नव्हतं. दोन मिनिटांनी तो सावकाश म्हणाला, " पण आबा, इतक्यात काय घाई होती लग्नाची ? वकिलीला आताच तर कुठे सुरुवात केली आहे. थोडा तरी जम बसायला हवा–"

" अरे, आग लाव तुझ्या त्या वकिलीला ! तुला काय कमी आहे इथे ! ही इस्टेट सांभाळ, आणि इथेच कर तुझी प्रॅक्टिस. शिवाय भाऊराव म्हणजे उमरावतीतील फार मोठी असामी ! तुला काय कमी करतील ते ? असं स्थळ नेहमी येत नसतं पोरा ! "

" पण आबा, मला निदान मुलगी तरी नको का बघायला ? "

" विश्वासा, अरे, मुलगी काय बघतोस ? बघितलीस तर हरवून बसशील स्वतःला. हा फोटो बघ. शिवाय बी. ए. आहे, गाणं छान म्हणते..."

" पण आबा... "

" आता पण नाही न् बीण नाही. हे लग्न ठरलंय्. ह्या आबासाहेबानं शब्द दिलाय्. हे लग्न आता झालंच पाहिजे आणि होणारच ! आणि इथे काय आम्ही तुझं अहित करायला बसलोय्, तर हे सतरा पण तू काढतोयस् ? ते काही नाही, हे लग्न ठरल्या वेळी, ठरल्या मुहूर्तावर होणारच ! जा, तू आता. "

* * *

तांब्याभांडं न् दुधाचा पेला घेऊन विशाखानं विश्वासच्या शयनगृहात प्रवेश

केला, आणि विश्वास तिच्याकडे बघतच राहिला. विशाखा साक्षात् सौंदर्यवती होती. नीटस ठेवणीची, रेखीव अवयवांची, गौरकाय विशाखा विश्वासला मनापासून आवडली होती. घाईघाईनं लग्न ठरवल्यामुळं आबांवर भडकलेला विश्वास, आंतरपाट दूर सरल्यानंतर मनोमन सुखावला होता. पहिल्या रात्रीची स्वप्नं रंगवीत तो बसलेला असतानाच, विशाखानं त्याच्या खोलीत प्रवेश केला, तेव्हा ती किंचित् बावरलेली, घाबरलेली वाटत होती. तिच्या सुरेल चेहऱ्यावर कुठल्यातरी अनामिक भीतीची छाया पसरलेली होती. आणि सौंदर्यात शालीनतेची झाक मिसळली गेल्याचा आभास विश्वासच्या मनासमोर उभा राहिला. तो तिच्याकडे बघतच राहिला. अगदी नकळत त्याच्या तोंडून उद्गार बाहेर पडले, सुंदर !

तांब्याभांडं न् दुधाचा पेला टेबलावर ठेवून, भिंतीला टेकून अधोमुख होऊन विशाखा उभी राहिली. ती किंचित् थरथरत होती. विश्वास उठला, विशाखाजवळ जाऊन उभा राहिला. "सुंदर ! विशाखा सुंदर ! !" असं म्हणत विश्वासनं तिचा हात आपल्या हातांत घेतला. आता मात्र विशाखा अक्षरश: थरथरली.

"विशाखा, खरंच आवडलीस तू मला, अगदी मनापासून ! आबांनी लग्न ठरवल्याचं सांगितलं, तेव्हा भडकलो होतो मी. पण आता मात्र वाटतं, आबांनी ही फार मोठी देणगी दिलीय् मला. खरंच विशाखा, फार भाग्यवान आहे मी." आणि विश्वास तिला जवळ घेऊ लागला. पण ती घाबरत होती, प्रतिकार करीत होती. विश्वासला दूर लोटू पाहत होती न् म्हणत होती,

"नको विश्वास, नको.

"विश्वास, तुम्ही मला जवळ घेणार. नको, नको विश्वास–" विशाखाच्या ह्या उद्गारांत किंचित् भीती, किंचित् साशंकता होती.

हातांनी तिला लपेटून घेत विश्वास म्हणाला, "वेडी कुठली. तुलाच जवळ घेणार, तुलाच. आणि इतकी की, तेथून तुला कुणीही दूर नेऊ शकणार नाही." विश्वास तिला आणखी जवळ ओढू लागला. तो तिच्या ओठांवर ओठ टेकणार तो तिनं अंगातलं सारं बळ एकवटून जोरानं ढकलून दिलं त्याला. स्फुंदत स्फुंदत ती म्हणाली, "वेड लागलंय का विश्वास तुम्हांला ? तुम्ही मला जवळ घेणार ? माझं चुंबन घेणार ? नाही. विश्वास नाही. तुम्ही हे काही करू शकणार नाही. मी तुम्हांला करू देणार नाही."

"पण का ?" अपमानीत झाल्यामुळे भडकलेला विश्वास तिला जवळ घ्यायचा प्रयत्न करीत आपल्याकडे ओढू लागला. त्याला दूर ठेवायचा प्रयत्न करीत ती शेवटी जवळजवळ अस्फुट ओरडलीच–

"तुम्हांला माहीत आहे, तुम्हांला माहीत आहे, विश्वास... मी...मी महारोगी आहे !"

ती ओरडली मात्र, विश्वास झट्कन् तिच्यापासून दूर झाला. आता तो अक्षरश:

कापत होता. विशाखा ओंजळीत तोंड झाकून घेत स्फुंदून स्फुंदून रडत होती. विश्वासच्या चेहऱ्यावर आश्चर्य दृग्गोचर होत होतं. हळूहळू आश्चर्याची जागा क्रोध घेऊ लागला. स्वतःला सांभाळून घेत त्यानं विचारलं, " विशाखा, कसली ही क्रूर चेष्टा ? "

" नाही, ही चेष्टा नाही, विश्वास ! हे सत्य आहे. आणि भाऊंनी तुम्हांला त्या सत्याची पूर्ण कल्पना लग्नाआधीच दिलेली आहे. "

" नाही नाही ! हे साफ खोटं आहे. " विश्वास जवळ जवळ ओरडलाच. " मला कसलीही कल्पना देण्यात आलेली नाही. मला काहीही सांगण्यात आलं नाही. खोटं, साफ खोटं ! ही शुद्ध फसवणूक आहे ! "

आता विशाखाच्या चर्येवर आश्चर्य ओसंडून राहिलं. तिच्याही डोळयांत अश्रूंच्या जोडीनं अंगार फुलू लागला. थोडा वेळ थांबून ती सावकाशीनं एकेक शब्द उच्चारीत म्हणाली– " नाही विश्वास, हे खोटं नाही, सत्य आहे. ह्यात कसलीही फसवणूक नाही. माझ्या प्रकृतीची संपूर्ण कल्पना भाऊंनी तुम्हा लोकांना दिलेली आहे. पंचवीस हजार हुंडा आणि वडिलांची त्यांच्या पश्चात माझी होणारी दहा लाखांची इस्टेट स्वतःच्या नावांनी करून घेऊन तुम्ही लोकांनी माझ्या ह्या व्यंगाची भर करून घेतली आहे. विश्वास, सत्य हे असं आहे आणि ते तुम्हांला माहीत आहे. "

" नाही नाही, ह्यांतलं मला काहीही माहिती नाही! विशाखा, काहीही माहिती नाही ! ह्यात काही तरी, कुठे तरी, कुणी तरी फार मोठी फसवणूक केली आहे माझी ! फसवणूक. हो फसवणूकच ! ! "

" विश्वास, तुम्हांला माहीत नाही ? आश्चर्य आहे ! पण झालेले कागदपत्र मी स्वतः प्रत्यक्ष पाहिलेले आहेत. त्यावर आमच्या भाऊंच्या आणि तुमच्या आबांच्या सह्या आहेत. शिवाय सर्व गोष्टींचा खुलासा भाऊंनी आधीच केलेला आहे. मीही भाऊंना तीच अट आधी घातली होती. "

" विशाखा, विशाखा ! ह्यांतलं एक अक्षर मला माहीत नाही. हे...हे सारं आबांनी जाणून बुजून केलं....तरीच ! आधी काही थांगपत्ता लागू दिला नाही... पण ताई...ताई ! काही समजत नाही...काही लक्षात येत नाही ! विशाखा, बोल... सांग, सगळं सांग मला. लक्षात येऊ दे सारं कारस्थान. सांग विशाखा, बोल ! "

" विश्वास, हे कारस्थान आहे, काय आहे ते मला माहीत नाही. तुम्हांला फसवलं गेलंय्, एवढं निश्चित; पण आमच्याकडून नाही एवढी खात्री बाळगा.

" ऐका विश्वास ! मी मॅट्रिक झाले न् ह्या रोगाचा माझ्या शरीरात प्रवेश झाला. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार तो महारोग नव्हता, पण तसलाच दुसरा कोणता तरी संसर्गजन्य रोग होता. नुकतीच सुरुवात असल्यानं तो असाध्य नव्हता. मात्र दुर्लक्ष झाल्यास त्याचं महारोगात पर्यवसान होण्यास वेळ लागणार नव्हता. आम्ही

औषधोपचार सुरू केला. आम्हांला वाटलं असतं तर ते व्यंग लपवून ठेवणं आम्हांला जड गेलं नसतं. पण ते मनाला पटलं नाही. आणि त्यामुळेच माझं कॉलेज सुटलं. मित्र-मैत्रिणी तुटल्या. मी बी. ए. झाल्ये, पुण बाहेरून अभ्यास करूनच !

" जवळ जवळ दीड वर्षांपूर्वी डॉक्टरांनी रोग आटोक्यात आल्याचं सांगितलं पण तरीही दोन-तीन वर्षं सावधगिरी बाळगायला हवी होती. भाऊंनी तर दीड वर्षा-पूर्वीच मला स्थळ पाहायचा प्रश्न काढला, न् मी नाही म्हटलं. पण भाऊंनी आपला हट्ट सोडला नाही. शेवटी प्रत्येक स्थळाला माझ्या तब्येतीची पूर्ण कल्पना देऊनच बोलणी करायची ही माझी अट भाऊंनी मान्य केली आणि स्थळ पाहायला माझी संमती घेतली.

" भाऊंनी खूप स्थळं शोधली, पण त्यांना यश आलं नाही. रोगाची माहिती ऐकताच नकार येऊ लागले. मला त्याचं काहीच वाटत नव्हतं. शेवटी भाऊंनी तुमचं स्थळ पक्कं केल्याचं सांगितलं तेव्हाच मला धक्का बसला ! केवळ पैशाच्या मोहानं होकार मिळाल्याचं एकंदर बोलणी ऐकून मी ताडलं, तेव्हा मला तुम्हा लोकांचा फार राग आला. पण केवळ भाऊंना दुखवू नये, म्हणून मी तयार झाले."

विश्वास सुन्न होऊन, आढ्याकडे नजर लावून पलंगावर पडून राहिला होता विशाखाचं बोलणं ऐकत ! विशाखा त्याच्या पायांशी बसून डोळ्यांतून आसवं गाळीत तिडिकीनं सांगत होती. विशाखाचं सांगून संपलं आणि तिनं विश्वासच्या पायांना मिठी मारून डोळ्यांतील अश्रूंना वाट मोकळी करून दिली. विश्वासनं दीर्घ निःश्वास सोडला. उठून बसत निस्तब्धपणे तो तिच्या केसांतून हात फिरवीत राहिला. बराच वेळपर्यंत ती दोघं त्याच स्थितीत निःशब्द बसून राहिली होती. थोड्या वेळाने विश्वासने स्वतःला सावरून घेतलं. विशाखाला जवळ घेऊन तो तिच्या चेहऱ्यावरून, केसांवरून हळुवारपणे हात फिरवू लागला. तिच्या डोळ्यां-तून पाझरणारे अश्रू टिपून घेऊ लागला. डाव्या हाताने कवेत घेऊन तो तिला हळुवारपणे थोपटू लागला. त्या स्पर्शात तिला माया आढळली, त्यानं ती सुखावली. त्या स्पर्शात तिला विश्वास आढळला, दिलासा मिळाला; आणि आधार मिळाल्याची खात्री होताच ती त्याला बिलगली– आत्यंतिक जिव्हाळ्यानं. "विश्वास, बाकी सर्व दृष्टींनी मी तुम्हांला सुख देऊ शकेन. तुम्हांला कुठेच दुखवणार नाही. पण...पण, शारीरिक सुखाला मात्र तुम्ही वंचित राहणार. तुमचं दुःख मी जाणू शकते. तुम्ही मला समजून घेऊ शकलात हेच खूप. विश्वास ! ... विश्वास, मी तुमच्या सुखाच्या आड येणार नाही. तुम्ही..." पण विश्वासनं तिच्या तोंडावर हात ठवीत तिला गप्प केलं. तिच्या कपाळावर हलकेच ओठ टेकीत तो म्हणाला, " वेडी का तू विशाखा ! देवा–ब्राह्मणांच्या साक्षीनं आपलं लग्न लागलं ते का एकमेकांपासून दूर राहण्यासाठी ? विवाह हा दोन जीवनांचं मीलन घडवतो– अतूट असं नातं निर्मितो. सुख–दुःख, देणं–घेणं, किंबहुना व्यवहारातल्या प्रत्येक

क्षणाचे ते दोन अभक्त भागीदार असतात ! विशाखा, इथून पुढे आपला जीवन–मार्ग एक आहे. तुझं सुख, तुझं दुःख, तुझ्या चिंता, तुझे रोग– ते सारं सारं माझं आहे.

" आपण डॉक्टरना भेटू. मार्ग शोधून काढू. तू निर्धास्त रहा. विशाखा, " बोलता बोलता तो तिला कुशीत घेऊन थोपटू लागला. तीही त्याच्या कुशीत आणखी, आणखी सरकली; आणि त्या मिठीतच ती दोघे निद्रादेवीच्या कुशीत शिरली !



सकाळी विश्वास थोडा लवकरच उठला. त्यानं पाहिलं, विशाखाच्या चेहऱ्यावर निरागस हास्य विलसत होतं. शांत समाधान तिच्या चेहऱ्यावर फुललं होतं. त्या अस्फुट कलिकेच्या चेहऱ्यावरचे मुग्ध भाव पाहून विश्वास हरखून गेला. त्यानं अगदी हलकेच तिच्या ओठांवर आपले ओठ टेकले. हळुवारपणं तिला थोपटल्यासारखं केलं आणि तिच्या अंगावरचं पांघरूण सारखं केलं !

* * *

" आबा, मला बोलायचंय थोडंस तुमच्याशी. "

मासिक वाचण्यात गुंतलेल्या आबासाहेबांनी, मासिकातनं तोंड वर करून समोर उभ्या असलेल्या विश्वासकडे प्रश्नार्थक मुद्रेनं पाहिलं. ताईंनाही ह्या प्रकरणात काहीच कल्पना नसल्याचं ताई-कडूनच समजल्यामुळं विश्वास हतबुद्धच झाला होता. आबासाहेबांविषयी तिरस्कारयुक्त क्रोध त्याच्या मनात भरून आला होता, आणि त्याच्या चेहऱ्यावर तो दिसून येत होता. संथपणे त्याच्याकडे पाहत आबासाहेबांनी खुणेनंच त्याला खुर्चीवर बसायला सुचवलं. खुर्चीत बसल्यावर त्यांनी त्याला पुन्हा एकदा न्याहाळलं. तो येणार हे जणू त्यांनी अपेक्षिलंच होतं असा भाव दर्शविणाऱ्या मुद्रेनं त्यांनी त्याला न्याहाळलं आणि म्हटलं–

" हं बोला, काय म्हणताय ?"

आधीच भडकलेला विश्वास, आबांच्या ह्या थंडपणामुळे आणखीनच भडकला.

त्यान एकदम मुद्यालाच हात घातला.

" आबा, विशाखाला महारोगासारखा रोग होता हे तुम्हांला माहीत आहे ? "

" हो ! " विश्वास एकदम सरळच असा प्रश्न टाकील अशी कल्पना नसल्यानं भांबावलेले आबासाहेब स्वतःला सावरून घेत बोलले.

" लग्नाआधीच तुम्हांला सर्व गोष्टीची जाणीव दिली गेली होती ? "

" हो. लग्नाआधीच समजलं होतं सारं मला ! "

" तरीही तुम्ही हे लग्न लावून दिलंत, आबा ! पंचवीस हजार हुंडा आणि सर्व इस्टेट घेऊन तुम्ही कसायाचा खेळ खेळलात, आबा, का ? कशासाठी ? बोला, आबा, बोला "

" तुझ्यासाठीच पोरा, तुझ्यासाठीच केलं हे सारं ! तुझी जन्माची ददात मिटावी म्हणून केलं हे सारं. शिवाय भाऊरावांची पण मुलगी उजवली जात नव्हती. जा विश्वास, जा. जास्त विचार करू नकोस ह्यावर ! "

" पण आबा, निदान त्या अश्राप पोरीचा तरी विचार करायचा. उमलू लागलेल्या कळीला उमलण्यापूर्वीच खुडून घ्यायचा तुम्हांला काय अधिकार आबा ? का, का असं लाजिरवाणं कृत्य केलंत आबा ? "

" त्यात काहीही गैर नाही. विश्वासा ! पोरीची नड होती. आपण भागवली. आपल्याला मोबदला मिळायला हवा होता, तो मिळाला, न् भाऊसाहेबांबरोबरचा व्यवहार संपला. तूही त्या पोरीबरोबर जन्म काढायचा नाही आहेस. तुला मी दुसरी सोयरीक पाहून देईन. "

" नाही आबा, ते शक्य नाही. " विश्वासाचा तोल आता ढळला होता. जिभेवरचा ताबा सुटू लागला होता. " आबा, तिचा गळा कापूनच्या कापून तुम्ही वर हे मला शिकवता ? हिंदू स्त्री-पुरुष लग्न करतात ते एकदाच, आणि ज्याच्याशी करतात त्याच सहचऱ्याशी ते जन्मभर प्रामाणिक राहतात ! किती खाली घसरलात आबा, तुम्ही ? तुमचा मुलगा म्हणवून घ्यायचीसुद्धा लाज वाटेल आबा, मला. ताईसारखी साध्वी घरात असतानाही तुम्ही जन्मभर बाहेर हुंदारलात आबा, आणि आता मलाही..."

पण विश्वासचं वाक्य पूर्ण होऊ शकलं नाही. आबासाहेबांनी तत्पूर्वीच विश्वासच्या कानशिलावर आपली पाची बोटं उमटवली होती.

" तुझी जीभ फारच वळवळतेय पोरा ! कोणासमोर उभा आहेस लक्षात आहे ना? आता नीट ऐक विश्वास, तुझं आणि विशाखाचं नातं इथंच संपलं पाहिजे. तो रोग तिच्यापुरताच मर्यादित राहिला पाहिजे. तू दुसरी सोयरीक कर न्...न् विशाखाला दूर कर. ती पोरगी ह्या घरात जास्त राहता कामा नये. "

" आणि आबा, तुम्हीही लक्षात ठेवा. मी आहे तोवर विशाखा इथेच राहणार. मग भले मला महारोग होवो नाहीतर आणखी काही ! आणि विशाखाला दगा-

फटका झाला तर लक्षात ठेवा. आबासाहेब, आतासारखी तुमची गय होणार नाही."

* * *

विशाखा हळूहळू घरात रुळू लागली होती. विश्वासच्या सहवासात फुलू लागली होती. एक वेगळं तेज तिच्या अंगोपांगी झळाळू लागलं होतं. दिवसादिवसाला आत्मविश्वास वाढत होता. ताईंनी तिच्या आईची आठवण तिच्या ठिकाणी जागी केली होती. तीच माया, तेच प्रेम, तेच वात्सल्य ! विश्वास तर तिला फुलाप्रमाणे जपत होता. तिच्या मनाला जपत होता. तिच्या मनात फुलबाग फुलवायचा प्रयत्न करीत होता ! दर सोमवारी ती दोघं नागपूरला डॉक्टरकडे जात. डॉक्टरांना तब्येत दाखवत. डॉक्टरांचे अभिप्राय उत्तम येऊ लागले होते. रोगाच्या समूळ उच्चाटनाची चिन्हं दृग्गोचर होऊ लागली होती आणि विश्वास–विशाखा नव्या स्वप्ननगरीत रमू लागली होती ! लग्नाच्या सुरुवातीला आलेलं मळभ दूर होऊ लागलं होतं. नवं विश्व फुलू लागलं होतं. जुन्या आठवणी मागे पडून आनंदाची, हास्यविनोदाची कारंजी उडू लागली होती. विशाखा त्या घराशी समरस होत होती.

पण आबासाहेबांना हे सारं पसंत नव्हतं. जुना रोग केव्हाही डोकं वर काढील हे आबासाहेबांचं मत होतं न् म्हणूनच विशाखाचं घरात मोकळेपणी वावरणं त्यांना पसंत नव्हतं. त्यांनी एक-दोनदा तसं बोलून दाखवावयाचा प्रयत्नही केला; पण विश्वासनं एका तुच्छतादर्शक नजरेनंच त्यांना गप्प केलं आणि ताईंनीही त्यांच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष केलं. ते स्वतः मात्र विशाखापासून दूर दूर राहत होते. आणि पर्यायानं, त्यामुळेच सारीजणं त्यांच्यापासून दूर दूर जात होती. नागपूरला रामराम ठोकून विश्वासनं पुलगावलाच वकिली चालू केली होती, आणि त्याबरोबरच घरातली सारी सूत्रंही त्यानं स्वतःकडे घेतली होती, हेही कदाचित् आबासाहेबांचं सर्वांपासून वेगळं पडण्याचं कारण असेल.

ह्या खेपेला आबासाहेबांनीही नागपूरला जायचा बेत आखला तेव्हा विश्वास चकितच झाला. विशाखानंही जेव्हा त्याला, 'आबा म्हणताहेत तर येऊ देत आपल्याबरोबर', असं सुचवलं, तेव्हा त्याचा नाइलाज झाला आणि ती तिघंही नागपूरला आली. नागपूरला पोचताच त्या दोघांना हॉटेलवर सोडून, आबासाहेब सकाळपासूनच बाहेर निघून गेले. दुपार टळून गेली तरी आबा आले नाहीत, तेव्हा विशाखाच्या मनात चलबिचल सुरू झाली. पण विश्वासनं तिची समजूत घातली, आणि ते डॉक्टरकडे गेले.

डॉक्टरांनी संपूर्ण तपासणी केली तेव्हा सहा वाजून गेले होते. कधी नव्हे ते डॉक्टरांनी प्रथमच सांगितलं, " मला पुन्हा किंचित् संशय येतो आहे. तुम्ही आजच्या दिवस इथेच राहा. आपण उद्या पुन्हा संपूर्ण चेक करू. तूर्त एक इंजेक्शन मी दिलं आहे." डॉक्टरांच्या शब्दांनी विशाखा दचकलीच. संपूर्ण बऱ्या झाले असं ऐकण्याच्या तयारीनं आपण आलो आणि हे असं कसं झालं ? तिला काहीच कळेना. ती एकदम

रडू लागली. विश्वासने तिची समजूत घालायचा प्रयत्न केला, पण त्यात तो यशस्वी झाला नाही.

" Don't worry my boy ! I am just having a doubt. It may not be correct too."

डॉक्टरांनीही धीर द्यायचा प्रयत्न केला.

ती दोघं हॉटेलवर पोचली तेव्हा आठ वाजायला आले होते. आबासाहेब अजूनही परतले नव्हते. दोघंही विमनस्कपणे बसले असतानाच हॉटेलच्या पोऱ्यानं एक तार आणून दिली, आणि विश्वासपुढे एक नवीनच समस्या उभी राहिली.

" ताईसाहेब अत्यवस्थ. निघा.—दिवाणजी. " तारेतला हा मजकूर विश्वासच्या डोळ्यांसमोर नाचत होता. तिकडे आई न् इकडे पत्नी—काय करावं अन् काय नाही, विश्वासला काहीच सुचत नव्हतं. आबासाहेबांचाही अद्याप पत्ता नव्हता. शेवटी विशाखानंच तोडगा काढला, आणि विश्वासनं रात्री जाऊन सकाळी लवकरच मोटर-सायकलवरून परतावं असं ठरलं.

विशाखाला सोडून विश्वास निघाला खरा, पण त्याच्या मनात हलकल्लोळ माजला होता. काहीतरी चुकतंय असं त्याला वाटत होतं. कुठलीतरी अनामिक भीती त्याच्या मनाला ग्रासून राहिली होती. नागपूर–पुलगावचा प्रवास त्यानं मनाच्या तशा दोलायमान स्थितीतच पार पाडला. संपूर्ण वाटेत त्याला त्या प्रश्नांची उकल होत नव्हती. आबासाहेब कुठे गेले असावेत हेही कोडं उलगडत नव्हतं. ताईंची तब्येत एकदम बिघडली असली तर, कोणत्याही परिस्थितीत आबासाहेबांचं त्यांच्या-जवळ असणं आवश्यक वाटत होतं, आणि आबासाहेबांचा तर दिवसभरात पत्ताच नव्हता. ताईंना काय सांगावं ? विशाखाचं उद्या काय होणार ? ताईंना सोडून पुन्हा विशाखाकडे धाव घ्यावी लागणार ? सगळे प्रश्न विश्वासचं डोकं भणाणून सोडत होते.

आणि ह्याच विमनस्कं स्थितीत तो घरी पोचला. बंगलीचं पुढचं दार बंद होतं, घरात संपूर्ण काळोख पसरला होता. विश्वासला आश्चर्यंच वाटलं. विश्वासनं बेल दाबली. दार उघडलं गेलं आणि विश्वासला आश्चर्याचा धक्काच बसला—खुद्द त्याच्या ताईंनीच त्याला दार उघडलं होतं. विश्वास आ वासून ताईकडे बघत तसाच उभा राहिला.

" असा बाहेरच उभा का तू विश्वास ? काय झालं तुला ? विशाखा कुठे आहे ? " दारातच उभ्या राहिलेल्या विश्वासवर जेव्हा ताईंनी प्रश्नांची सरबत्ती केली तेव्हा विश्वासचं आश्चर्य आणखीनच वाढलं. त्यानं खिशातून तारेचा कागद बाहेर काढला आणि ताईंना दिला. ह्या वेळपर्यंत दिवाणजीही बाहेर येऊन उभे राहिले होते. तारेतला मजकूर वाचताच दिवाणजी अवाक् होऊन उभे राहिले. विश्वासनं दोघांकडं आळीपाळीनं पाहिलं; आणि त्यानं ताडलं की, ताईंना आणि

दिवाणजींना त्यातलं काहीही माहिती नव्हतं. त्याच वेळी त्याच्या लक्षात आलं आबासाहेबांचं दिवसभर गायब होणं ! लक्षात आले आबासाहेबांचे विशाखा-विषयीचे विचार, आणि तो एकदम चरकला ! ! त्याचे विचार वाऱ्याच्या वेगानं धावू लागले, आणि शेवटी स्थिरावले ते एका कटू तर्काभोवती—विशाखाला दगा-फटका तर झाला नसेल ना ?

" मी...मी तर काही तार केली नव्हती. कुणी केली असेल ही खोटी तार ? आणि का ? " पण दिवाणजींचे हे शब्द विश्वासला ऐकूच गेले नाहीत. आपल्याच विचारांच्या तंद्रीत तो होता. त्याच तंद्रीत तो बऱ्याच वेळानंतर एकदम ओरडला— " दगा ऽऽऽ ! "

* * *

ताई आणि दिवाणजींसह विश्वास नागपूरला आला, पण त्याला खूपच उशीर झाला होता. हॉटेलमधल्या त्या खोलीचं दार उघडायलाही त्यांना प्रयास पडला. महत्प्रयासानं खोली उघडून त्यांनी आत प्रवेश केला तेव्हा विशाखा शेवटच्या घटका मोजत होती. विश्वासनं तिच्या कॉटजवळ जाऊन तिला हलक्या आवाजात हाक मारली. विशाखाने क्षीणपणे डोळे उघडले, पण त्या डोळ्यांत ओळखीचा भाव मात्र नव्हता. काहीतरी बोलण्यासाठी तिच्या ओठांची अस्पष्ट हालचाल झाली, पण शब्दोच्चार स्पष्ट नव्हते. विश्वासनं तिच्या ओठांजवळ कान नेले. अगदी आतून, खोल स्वरांत आलेले क्षीण, तुटक तुटक शब्द त्याला ऐकू आले. " धोऽका...मामंजी ......इं...जेऽऽ...क्शन..." त्यावरून स्पष्ट नाही, पण अंधुकशी कल्पना विश्वासच्या मनाला चाटून गेली. अखेर त्याचा तो तर्क खरा ठरला होता. आबासाहेबांचा डाव यशस्वी झाला होता ! नको ते घडलं होतं ! तो सुन्नपणे विशाखाच्या केसांवरून हात फिरवीत राहिला. थोड्या वेळानं विशाखानं डोळे उघडले. त्या होणाऱ्या स्पर्शानं तिच्या चर्येवर सूक्ष्म हास्य उमटलं, " विश्वास...तू...तुम्ही...वे...ळेवर... मामंजी रात्री...दहा वाजता......त्यांऽऽच्या उतारवयात त्यांना सोऽऽडू नऽऽका... ताई......मला तुमची मांडी..." विशाखा अस्पष्टपणे बोलत होती. विश्वासच्या डोळ्यांतून अश्रूंची धार लागली होती. ताई न् दिवाणजी निःस्तब्ध होते. त्यांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या होत्या. अस्फुट हुंदके मधनंच उमटत होते.

विश्वासनं विशाखाचं डोकं आपल्या मांडीवर घेतलं. आणि दोनच क्षणांत तिची ज्योत मालवली ! विश्वासनं मोठ्यांदा हंबरडा फोडला, आणि विशाखाच्या अंगा-खांद्यावर, हृदयावर हात ठेवून तो चाचपू लागला. ताईंनी मनाला घातलेला बांध आता फुटला होता. ते दृश्य सहन न होऊन दिवाणजी डोळ्यांना रुमाल लावून बाहेर निघून गेले. विशाखा हे जग सोडून गेली होती ! आबासाहेब देशमुखांची सून

त्यांच्याच डावात फसली होती, हरली होती ! !

आणि खुद्द आबासाहेब मात्र अजूनही गायब होते !

वर्धा नदीच्या पात्रात–पंचधारेच्या डोहात–दोनच दिवसांनंतर विश्वासनं आपला देह झोकून दिला.

पंधरा दिवसांचा कालावधी मध्ये लोटला होता. विश्वासचे वकील आबासाहेबांच्या बंगल्यावर बसले होते. वकील काहीतरी समजावून सांगत होते, आणि आबासाहेबांच्या थकलेल्या डोळ्यांतून अश्रूंची धार वाहत होती.

* * *

तीन वर्षं होऊन गेली आज ह्या गोष्टीला. आबासाहेब देशमुखांच्या प्रशस्त बंगलीचा खूपच विस्तार झालाय आज आणि त्या ठिकाणी 'विशाखा सॅनिटोरियम' उभे आहे. सॅनिटोरियमच्या प्रवेश दालनातच विशाखा-विश्वासचे फोटो आहेत. पुलगावच्या मध्यवर्ती भागात मोफत वाचनालयाची प्रशस्त इमारत 'विशाखा ट्रस्ट'मधून उभी आहे. कित्येक गोरगरीब 'विशाखा ट्रस्ट'मधून शिष्यवृत्त्या घेऊन आपलं जीवन उजाळण्याचा प्रयत्न करीत आहेत. दहा लाखांचा प्रचंड ट्रस्ट असंख्य गोरगरिबांचा दुवा घेत आहे.

विश्वास-विशाखांच्या मृत्युनंतर सहाच महिन्यांनी ताईंनी हे जग सोडलं. आणि त्याच दिवसापासून आबासाहेबांनी पुलगाव सोडलं; तो अजूनही त्यांचा कुणालाच पत्ता नाही.

पंचधारेच्या डोहातून मात्र क्वचित् आवाज उमटल्याचा भास होतो–'विशाखा, मी येतोय् !'

**( कथा, प्रसंग व पात्रे संपूर्ण काल्पनिक )**

●

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

# शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.

वार्तापत्र

# आ सा म

## सारा आसाम जाताना

"हे श्री. धरणीधर दास 'आसाम सोशॅलिस्ट फोरम'चे सेक्रेटरी," श्री. शरत्चंद्र सिन्हा यांनी माझी ओळख करून दिली. "हेसुद्धा तुम्हांला आक्रमणाविषयी अधिक माहिती सांगतील."

खरे म्हणजे आक्रमण हा शब्द इथे मी वापरायला नको होता. कारण स्वत: श्री. सिन्हा यांच्या मते हा प्रश्न राजकीय आक्रमणाचा नसून आर्थिक हालचालींचा आहे. इन्फिल्ट्रेशनचा नसून इमिग्रेशनचा आहे. त्यांच्याशी चर्चा करण्यापूर्वी इतर राजकीय पक्षांच्या नेत्यांनीदेखील मला हेच सांगितले होते. आणि कुणी सांगायच्या आधीच मला हे पटले होते.

कारण उघड आहे. आक्रमणाचा १९०० पासूनचा इतिहास पाहिला की पूर्व बंगालातून लाखोंच्या संख्येने घुसणारे हे लोक केवळ स्वत:चे पोट भरण्यासाठी स्वत:चे घरदार सोडीत होते. त्यामागे दुसरा कोणताही उद्देश नव्हता. तीच नैसर्गिक प्रक्रिया पाकिस्तान-निर्मितीनंतरही चालू राहिली. या लाखो शेतकऱ्यांचा घुसखोरीमागचा उद्देश दुसरा-तिसरा कोणताच नसून काम आणि अन्न मिळविणे एवढाच दिसतो.

श्री. धरणीधर दास मला हेच सांगत होते. माझी ओळख करून देताच ते जरा सावरून बसले. पुन्हा तोच हळुवारपणा. या प्रश्नाचा त्यांनी चांगलाच अभ्यास केला असावा. ते जरा पोटतिडिकीने बोलत होते.

श्री. दास म्हणाले, "लाखोंच्या संख्येने एवढे लोक आपली घरेदारे सोडून केवळ राजकीय उद्देशाने भारतात येत असतील तर खरोखर त्यांच्याएवढे प्रखर देशभक्त तेच. ही कल्पनाच वस्तुस्थितीला

# ३



# उघडया डोळयांनी पाहावा लागेल !

वरून नाही. लोक गरीब असतात. जिथे अन्न मिळेल तिकडे ते जातात. कारण आपण भारतात आहोत की पाकिस्तानात याचीही त्यांना नीटशी कल्पना नसते. हे राजकीय आक्रमण नव्हेच. आता एका देशातून दुसऱ्या देशात आलेल्यांचा हा प्रश्न असल्यामुळे तो राजकीय ठरतो ही गोष्ट खरी आहे. पण मूळ हेतू आर्थिक आहे ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे."

थोडा वेळ थांबून श्री. दास म्हणाले, "याला राजकीय रंग भरला आहे तो जनसंघ आणि हिंदुसभा यांसारख्या जातीय पक्षांनी ! या गोष्टींचे आपल्या निवडणुकीत भांडवल करण्यासाठी. या निमित्ताने जातीय तेढ वाढविण्याचा त्यांनी बराच प्रयत्न केला."

श्री. दास हे श्री. सिन्हा आणि काँग्रेसमधील एक मोठा गट यांच्या मनच्या गोष्टी बोलत आहेत ते मला ठाऊक होते. म्हणून मी त्यांचे बोलणे लक्षपूर्वक ऐकत होतो. मी विचारले, "पण या घुसखोरांमध्ये काही राजकीय हेतू घेऊन येणारी माणसेही असतीलच की !"

श्री. दास म्हणाले, "हेरगिरीबद्दलच म्हणता ना ? सहज शक्य आहे; पण हेर कसे असतात याची कल्पना करा. हेरांचे व्यक्तिमत्त्व संशयातीत असावे लागते. भारतात येणारा पाकिस्तानी हेर मुस्लिम असून चालणार नाही, तो हिंदूच असावयास हवा. पूर्वी दिल्लीत आणि कलकत्त्यात पकडलेले पाकिस्तानी हेर हिंदूच होते."

श्री. दास यांचे बोलणे पटत होते; पण आणखी काही शंका होत्याच. अजूनही पाकिस्तानी मुस्लिम आसामात घुसतात

हे खरे आहे. त्यांच्या बऱ्याचशा श्रद्धा पाकिस्तानकडेच नसतील का ? आसामातील मुस्लिमांची संख्या त्यामुळे वेगाने वाढते आहे. ती एवढ्या वेगाने की घुसखोरांचा हा वेग कायम राहिला तर काही वर्षांतच आसामातील मुस्लिम बहुसंख्य बनतील. आणि मग भविष्यात त्याचे परिणाम काय घडतील ? १९११ सालपासून हे मुस्लिम बंगालातून येत होते हे खरे आहे: म्हणून आता पूर्व बंगालचे वेगळे राज्य झाल्यानंतरही त्यांना काहीच अडथळा न आणता तसेच येऊ देणे इष्ट आहे काय ?

भविष्याविषयी प्रश्न विचारताच एक तर बरेच पुढारी गप्प तरी राहतात किंवा भलतीच काही तरी उत्तरे देऊ लागतात. श्री. दास म्हणाले, "आपले धर्मातीत राज्य आहे ना ? आपण सर्व धर्मांना, सर्व जमातींना समान वागणूक देतो. सर्व अल्पमतवाल्यांना आपण समान वागणूक देतो. आपले समाजवादी राज्य आहे. आसामात मुस्लिमांची संख्या वाढत असली आणि त्यामुळे आपणांला वाईट वाटत असले, भीती वाटत असली तर आपला धर्मातीतपणा, आपला समाजवाद कुठे गेला ? काश्मीरमध्ये मुस्लिमांची बहुसंख्या आहेच ना ? मग ? भारत-पाकिस्तान युद्धाच्या वेळी 'सशस्त्र' पाकिस्तानी घुसखोर काश्मिरात घुसू लागले तेव्हा तेथील मुस्लिमांनीच त्यांना पकडून दिले नाही का ? तिथल्या मुस्लिमांवर तुम्ही अविश्वास दाखवू शकत नाही, मग आसामवरच हा रोष ? --"

"अहो, पण काश्मीर आणि आसामची तुलना कशी करता ? मुख्य फरक हा आहे की काश्मीरातील मुसलमान गेल्या कित्येक शतकांपासून तिथेच आहेत. आणि आसामातील मुसलमान पाकिस्तानातून नव्याने इथे आले आहेत. प्रश्न मुस्लिमांचा नसून..."

परंतु मी मध्ये या आणलेल्या अडथळ्यांकडे श्री. दास यांचे लक्ष नव्हते. त्यांच्या बोलण्याचा ओघ चालूच होता. आसामी मुसलमानांना कशी दुय्यम दर्जाची वागणूक मिळते आहे आणि त्यामुळे आपल्या समाजवादाला व धर्मातीततेला कशी मूठमाती मिळते आहे हे ते आवेशाने सांगत होते. ते जरी इंग्रजी अडखळत अडखळत बोलत होते तरी त्यांची भाषा सुरेख होती. या प्रश्नांसंबंधीचा त्यांचा आवेग एखाद्या भाषणात बोलावे त्याप्रमाणे ते व्यक्त करीत होते. भारतीय मुस्लिमांवर होत असलेल्या अन्यायाबद्दल त्यांना खरोखरच मनापासून चीड वाटत असावी.

## ओल्याबरोबर सुके जळल्याचे दुःख !

श्री. धरणीधर दास यांना मध्येच उठून कुठेतरी बाहेर जावे लागले आणि आतापर्यंत बाहेर गेलेल्या श्री. सिन्हांनी चर्चेची सूत्रे पुन्हा हाती घेतली. श्री. सिन्हा यांनी मला भरपूर आकडेवारी दिली. आसामपेक्षा पश्चिम बंगाल, बिहार आणि त्रिपुरा या राज्यांमध्ये पाकिस्तानी घुसखोरी अधिक प्रमाणात होत असल्याचे आकडेवारीवरून पटवून दिले. आणि पाकिस्तानी घुसखोरांना परत पाठविण्याच्या प्रयत्नांत

भारतीय मुसलमानांचा कसा छळ होतो, त्यांच्यावर कसा अन्याय होतो याचे त्यांनी तपशीलवार वर्णन केले.

श्री. सिन्हा म्हणाले, "आतापर्यंत गेल्या पाच वर्षांत सुमारे पावणेदोन लाख घुसखोरांना परत पाठविल्याचे आसाम सरकारने जाहीर केले आहे. त्यांमध्ये कितीतरी भारतीय मुसलमान असतील. गेल्या चार-चार पिढ्या ज्यांनी इथे काढल्या, ज्यांचा जन्म इथे गेला, इथल्या मातीचे अन्न ज्यांनी खाल्ले अशा कितीतरी मुस्लिमांना पाकिस्तानी घुसखोर म्हणून शिक्का मारून हाकून देण्यात आले. आणि म्हणून आम्हांला दुःख आहे."

श्री. सिन्हा बराच वेळ बोलत होते. ते एक हिंदुस्थानविषयी—वन् नेशन थियरीविषयी—बोलत होते. ते म्हणत होते,

"भारत आणि पाकिस्तान यांनी एकत्र येऊन एक देश व्हावा असे अजून बऱ्याच जणांना वाटते. हे खरे आहे ना? परंतु मुस्लिमांकडे आपण नेहमीच संशयित नजरेने पाहिले तर हे स्वप्न कधीच फळाला येणार नाही. पूर्व पाकिस्तानी मुस्लिमांना 'पाकिस्तान' या भावनेविषयी काही विशेष आपलेपणा नाही. पाकिस्तानविषयी त्यांना विशेष आकर्षण नाही. त्यांना आपल्या बंगला संस्कृतीविषयी अधिक आत्मीयता वाटते. वस्तुस्थितीच पाहायची म्हटले तर पूर्व पाकिस्तानी मुस्लिमांना पश्चिम पाकिस्तानविषयी घृणा आहे. पश्चिम पाकिस्तान्यांच्या बंधनातून ते बंडखोरपणे मुक्त होऊ पाहत आहेत. अशा परिस्थितीत पाकिस्तानातून येणाऱ्या घुसखोरांविषयी आपण अधिक शहाणपणाचे आणि वास्तववादी धोरण स्वीकारायला नको का? तसेच भारतीय मुस्लिमांनाही त्यांचे योग्य ते स्थान द्यायला नको का?"

ही विचारसरणी मांडणाऱ्या काँग्रेस गटाचा गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत चांगलाच पराभव झाला होता. आसाम राज्याच्या नेतेपदाच्या निवडणुकीतही श्री. बिमलप्रसाद चालिहा यांच्याशी सामना देणारे श्री. देबकांत बरुआ यांचा पाडाव झाला होता. त्यामुळे आसाम मंत्रिमंडळात या गटाला जवळजवळ स्थान नाही.

परंतु मी आसामात होतो तेव्हाच या गटाच्या जोराच्या हालचाली सुरू होत्या चालिहा सरकारला सुखासुखी बसू द्यायचे नाही, असेच जणू या काँग्रेस गटाने ठरविले होते. विधानसभेच्या सभापतीच्या निवडणुकीसाठी अगदी शेवटच्या क्षणापर्यंत काँग्रेसतर्फे नाव सुचविले गेले नव्हते, याला कारण हीच अंतर्गत मारामारी.

विधानसभेतील काँग्रेस गटाची संख्या बावीसच्या जवळपास आहे. माजी शिक्षणमंत्री श्री. देबकांत बरुआ हे या गटाचे प्रमुख. हा गट पुरेसा समाधानी राहिला नाही तर बंड करून तो काँग्रेसबाहेर पडेल आणि डाव्या पक्षांशी हातमिळवणी करून संयुक्त सरकार स्थापण्याचेही प्रयत्न करील अशी भीती अनेक प्रकारांनी व्यक्त केली. आणि हे मुळीच अशक्य नाही. एक्कावन्न विरोधकांपैकी अकरा ऑल

पार्टी हिल लीडर्स कॉन्फरन्सचे आमदार सोडले तर बाकीचे चाळीस आमदार या बावीस बंडखोर काँग्रेस आमदारांशी सहज हातमिळवणी करतील ! कारण या डाव्या विरोधकांची आणि बरुआ गटाची घुसखोरीच्या प्रश्नावरील मते बरीचशी जुळतात. हिल लीडर्स यात भाग घेणार नाहीत याचे कारण त्यांना या बाबतीत मतच नाही. नव्हे या विषयाशी त्यांचा काहीही संबंध नाही आणि त्यांना त्यात रसही नाही.

देशातील एकंदर उत्पाताचे आणि बंडखोरीचे वातावरण पाहता आसाममध्येदेखील हे घडणे सहज शक्य आहे. मात्र तसे घडले तर फार मोठे नुकसान होण्याचा धोका बऱ्याच जणांना वाटतो. याचे कारण बरुआ गटाला मुस्लिम घुसखोरांविषयी वाटणारे संशयास्पद प्रेम. हा विषय निघाला की बरेचसे सुज्ञ आसामी गंभीर होतात. काही लोक बोलायचेच टाळतात तर काही एकदम भडकतात. आसामचे हे अत्यंत नाजूक दुखणे झाले आहे.

## उपाययोजना

आसाम प्रदेश जनसंघाचे या प्रश्नाविषयी फार कडक मत आहे. जनसंघाचे प्रदेश संघटन मंत्री श्री. देविदास आपटे याविषयी बोलताना मला म्हणाले, " पाकिस्तान–आसाम ही जवळजवळ २० मैलांची सारी सीमा मी स्वत: हिंडलो आहे. बऱ्याच ठिकाणी सीमा ' रोखणे ' त्यामुळे खरोखर कठीण आहे. "

या घुसखोरीवर प्रभावी उपाय त्यांनी सुचविला. ते म्हणाले, " सर्व सीमाभागाचा पट्टा मोकळा करून तेथील लोकसंख्या हलविली पाहिजे आणि या पट्ट्यात नंतर सेवानिवृत्त लष्करी नोकर व इतर देशभक्त जमातींना वस्ती करण्यास मदत करावी. यानेच हा प्रश्न सुटू शकेल. "

आर्थिकदृष्ट्या आणि शासकीयदृष्ट्या हे फारच मोठे आणि जिकिरीचे काम होईल, असे सुचविताच श्री. आपटे म्हणाले, " सर्व देशांनी हेच केले आहे. पाकिस्ताननेसुद्धा हेच केले आहे. १९६२ मध्ये पाकिस्तानने सीमेवरील केवळ हिंदूंनाच नव्हे तर सर्व बिगर मुस्लिमांना, ख्रिश्चन्स् वन्य जमातींचे लोक आदी– सीमेवरून हाकून लावले आणि तेथे मुस्लिमांची वस्ती करवली. पाकिस्तानला जर हे शक्य आहे तर आपणाला हे का शक्य नाही ? आणि तेच सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक आणि शहाणपणाचे आहे.

आसाम निवृत्त सैनिक संघाशी या बाबतीत जनसंघाने बोलणी केली असून हा संघ या बाबतीत सहकार्य देण्यास तयार असल्याचेही श्री. आपटे यांनी सांगितले.

जनसंघासारख्या संघटनेला ही घुसखोरी योजनाबद्ध असल्याचे वाटते, त्याचप्रमाणे आसामचे एक माजी मुख्यमंत्री श्री. विष्णुराम मेधी यांनाही वाटते. श्री. मेधी हे १९५० ते १९५८ च्या दरम्यान आसामचे मुख्यमंत्री होते आणि नंतर मद्रासचे गव्हर्नर होते. त्यांनी आपल्या कारकीर्दीत मोंगळ कारभाराचा नुसता गोंधळ घातला आणि

साऱ्या प्रश्नांचा नुसता गुंता करून ठेवला म्हणून अनेक राजकीय कार्यकर्ते आणि पत्रकार त्यांच्या नावाने लाखोली वाहतात. श्री. मेधी मात्र मला म्हणाले, "घुसखोरी तावडतोब थांबविली पाहिजे. तिचे मूळ आर्थिक असले तरी ती योजनाबद्ध असावी असा संशय येतो. आश्रय देणाऱ्या भारतीय मुस्लिमांना कडक शिक्षा दिल्या पाहिजेत. हा जातीय प्रश्न नव्हे, हा राष्ट्रीय प्रश्न आहे." मोठ्या प्रमाणावर खरी घुसखोरी झाली ती श्री. मेधी यांच्याच कारकीर्दीत. पण त्यांनी त्या वेळी अक्षरशः काही केले नाही, अशी त्यांच्याविरुद्ध तक्रार आहे.

"घुसखोरी योजनाबद्ध असण्याचा प्रश्नच नाही". आसाम कम्युनिस्ट पक्षाचे सेक्रेटरी श्री. सोनी भट्ट यांनी सांगितले. "घुसखोरीमागील मूळ कारण आर्थिक पोकळी हेच आहे यात संशय नाही. त्यामुळे घुसखोर राजकीय हेतूने प्रेरित होऊन भारतात घुसतात असे म्हणण्यात काही अर्थ नाही. त्यांच्यांत जर काही राजकीय प्रचार होत असेल तर तो येथील काही स्थानिक मुस्लिमांकडूनच! पण या घुसखोरांना हाकलून लावताना स्थानिक मुस्लिमांवर मुळीच अन्याय होता कामा नये."

आसाम प्रजासमाजवादी पक्षाचे सेक्रेटरी श्री. विश्व गोस्वामी यांचे मत वेगळे आहे. ते म्हणतात, "घुसखोरी ही समस्या आता जवळ जवळ नाहीच. आसामात जातीयता नाही. जातीयता आणणे आसामच्या राजकारणाच्या हिताचे नाही. जातीयता आणली की मगच मुस्लिम वेगळा विचार करू लागतात आणि त्याची जबाबदारी मग जे राजकारणात जातीयता आणतील त्यांच्यावर येईल."

मागील हिशेबात सांगितल्याप्रमाणे आसामातील मुस्लिमांची लोकसंख्या १९६१ च्या शिरगणतीप्रमाणे सुमारे २८ लाखांची होती. ती आता नैसर्गिक वाढीमुळे ३१–३२ लाखांवर गेली असणार. सुमारे सव्वा कोटी लोकसंख्येच्या आसाम राज्यात त्यामुळे मुस्लिमांचे मत निवडणुकांच्या दृष्टिकोनातून आता चांगलेच वजनदार झाले आहे. साहजिकच त्यांना दुखवायची कुणाची तयारी नाही. एवढेच नव्हे तर उलट त्यांच्या आधाराने सत्तेच्या पायऱ्या चढून जाण्याची उत्सुकता मात्र सर्वांना लागली आहे. मग घुसखोरीच्या प्रश्नावर पांघरूण घालावे लागले तरी त्याचे विशेष कुणाला वाटणार नाही.

## धुमसणारा ज्वालामुखी

केवळ सत्तालालसेने काही मूठभर गट 'या गोष्टीमागे असते तर फार काही बिघडले नसते. पण जे गट ही स्वप्ने पाहत आहेत त्यांच्याबद्दल सर्व आसामी जनतेत विशेष नापसंतीही नाही. आणि तीव्र प्रतिक्रियाही नाही. १९६० च्या भाषिक दंग्यांपासून बऱ्याच आसामी लोकांना इतर भारतीयांपेक्षा आसामी भाषा, आसामी चालीरीती यांच्याशी चटकन मिळते जुळते घेणारे मुस्लिम अधिक जवळचे वाटतात. त्यामुळे काहीच बिघडत नाही. पण या नादात पाकिस्तानी मुस्लिमांच्या

घुसखोरीवर पांघरूण घालण्याची किंवा ती कमी लेखण्याची जो प्रवृत्ती वाढते आहे तीबद्दल मात्र बऱ्याच लोकांना भीती वाटते आहे.

बऱ्याच जणांना भेटल्यावर मी गोहत्तीच्या काही पत्रकारांना भेटलो. आणि त्यांच्याशी माझी माहिती ताडून पाहिली. स्थानिक वृत्तपत्रांचे लोक या विषयावर सहसा बोलायचे टाळत असले तरी बाहेरच्या वृत्तपत्रांचे आणि वृत्तसंस्थांचे वार्ताहर भरपूर बोलतात. एकजण म्हणाला, "आमच्या कामाच्या पद्धतीमुळे या साऱ्या गोष्टी आम्हांला स्पष्टपणे लिहिता येत नाहीत. पण ही समस्या खरोखर अतिशय धोक्याची झाली आहे. साऱ्या गोष्टी आम्ही उघडचा डोळ्यांनी पाहतो. एखादे दिवशी सारा आसाम जाताना उघडचा डोळ्यांनी पाहण्याचा प्रसंग येण्याची भीती वाटते!"

दुसरा एक पत्रकार अधिक गंभीरपणे आणि काळजीने बोलत होता, "या प्रश्नाला तुम्ही जातीयवादाचे स्वरूप देऊ नका. जातीयवादाशी अक्षरशः याचा काही संबंध नाही. आसाममध्ये ही जी वेगळेपणाची, सांस्कृतिक स्वातंत्र्याची, दुर्लक्षिले गेल्याची भावना बळावते आहे, ती या गोष्टीच्या मुळाशी आहे. पण एकूणच सरसकट ही भावना बळावते आहे, असेही समजू नका. कुठे कुठे अंकुर फुटताहेत, कुठे ते वाढताहेत. वेळीच ते निपटून टाकले नाहीत तर मात्र धोका आहे!"

मला शिलाँगच्या त्या रागीट आसामी पत्रकाराची आठवण झाली. आसामी तरुणांना वेगवेगळे गट कसे भडकावीत आहेत हे त्याने सांगितले होते त्याची आठवण झाली.

आसाम काँग्रेसचे माजी अध्यक्ष श्री. श्रीमन गोस्वामी यांनी अगदी सुरुवातीला घुसखोरीचा प्रश्न मी काढताच जो आरडाओरडा केला त्यामागची व्यथा आता मला उमगली. "तुमचे आसामी लोक भारतात इतरत्र कुठे दिसत नाहीत हो," असे मी एकदा म्हणताच श्री. सिन्हा म्हणाले होते, "आम्ही इथेच असतो. पण साऱ्या भारतातून मात्र लोक इथे येतात. उपजीविकेसाठी." या म्हणण्यामागे आसामी लोक मागे पडत असल्याची, त्यांची पिळवणूक होत असल्याची जाणीव होती. सारेच आसामी असा प्रश्न विचारल्यावर अशाच प्रकारची कडवट उत्तरे देत होते. त्यामागे ही टोचणी तर होतीच. उपहासही होता. आणि आपल्या वेगळेपणाची नवी जाणीव होती.

वरून शांत दिसणाऱ्या ज्वालामुखीच्या पोटात प्रचंड हालचाल चालू असते. या हालचालीचा गंभीर ध्वनी आता ऐकू येऊ लागला होता. राजकीय कार्यकर्त्यांच्या, पुढाऱ्यांच्या, सामान्य माणसांच्या, पत्रकारांच्या बोलण्यामागचे अस्पष्ट सूर आता ओळखता येऊ लागले. त्यांच्या भीतीचा, त्यांच्या संशयाचा उलगडा होऊ लागला.

सुदैवाने आसामाचे मुख्यमंत्री श्री. बिमलप्रसाद चालिहा हे काळाची पावले ओळखून आहेत. त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल कोणत्याच गटात वाद नाही. सर्व

प्रश्नांवर ते राज्यातील सर्व परस्परविरोधी गटांना सांभाळून नेतात. सरकारचे स्थैर्य आसामच्या आजच्या परिस्थितीच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. हे स्थैर्य देऊन पुन्हा आसामातील पाकिस्तानी घुसखोरी निपटून टाकण्याचा त्यांचा निर्धार आहे. त्यासाठी आपल्याच पक्षातील एका गटाचा रोष ओढवून घेण्याचीही त्यांची तयारी आहे. म्हणून त्यांचे पत्रकारांना सांगणे आहे, " मी सर्व योग्य ते उपाय योजून घुसखोरी बंद करतो. पण तुम्ही मात्र आरडाओरडा करू नका. त्रिपुरा सरकारने नाही का घुसखोरी थांबविली. एक शब्द इकडचा तिकडे गेला नाही. " □


मराठी भाषेत **पॉकेट बुक्स** प्रकाशित होणार

**जेम्स बॉण्ड 007**

या सुप्रसिद्ध गुप्त हेराच्या From Russia with Love आणि The man with the Golden Gun या जगप्रसिद्ध कादंबऱ्यांचे अनुवाद पॉकेट बुक स्वरूपात प्रकाशित होणार. किं. प्रत्येकी ३ रु. रुपये ५/– भरून दोन्ही कादंबऱ्या घरपोंच मागवा. विक्रेत्यांना भरपूर कमिशन. लवकरच पॉकेट बुक्सची वार्षिक योजना जाहीर होत आहे. उत्तम या योजनेद्वारे जगातील पुस्तके आगाऊ पैसे भरल्यास घरपोच येतील. आपले ग्रंथालय समृद्ध करा.

**राजस प्रकाशन**

दूरध्वनि ] १८४ ब शनिवार, पुणे २ [ ५६४०८



**परसूच्या पशुकथा** — **वसंत सबनीस**

**सहा साहसे** — **दा. सी. देसाई**

**मूल्य प्रत्येकी दोन रुपये**

**राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.**



# आ सा म

## ४

"छे: छे: ! आता 'जर–तर'चा प्रश्नच उरला नाही. मुळीच नाही. ती वेळ केव्हाच निघून गेली. आमची वेगळ्या पहाडी राज्याची मागणी मान्य झालेली आहे, आणि आम्ही आम्हांला हवे ते मिळवणारच."

आसामातील ऑल पार्टी हिल लीडर्स कॉन्फरन्सचे जनरल सेक्रेटरी श्री. स्टॅन्ले निकोल्स रॉय मला निश्चयाने सांगत होते. त्यांच्या सांगण्यात आग्रह तर दिसत होताच, पण त्याचबरोबर आम्हांला हवे ते आम्ही कोणत्याही मार्गाने मिळवूच, अशी आक्रमक धमक दिसत होती. काही झाले तरी सरकारला आमच्या मागणीपुढे वाकावे लागेलच असा त्यात आत्मविश्वास दिसत होता. आणि सरकार नाही वाकले तर आम्ही वाकायला लावू, असा हट्टी बेमुर्वतखोरपणाही त्यात डोकावत होता.

खरं म्हणजे माझा प्रश्न वेगळाच होता. 'जर–तर' हे शब्द मी वेगळ्याच संदर्भात वापरत होतो; परंतु आसामातील पहाडी लोक आणि त्यांचे नेते या पहाडी राज्याच्या प्रश्नावर एवढे अधीर आणि चिडखोर झालेले आहेत की त्यांची सहनशक्ती आता संपत आली आहे. आसामातून निघून वेगळे पहाडी राज्य त्यांना दिल्याशिवाय दुसऱ्या कोणत्याच गोष्टीने त्यांचे समाधान होणार नाही. पहाडी राज्याशिवाय दुसऱ्या कोणत्याच गोष्टीशी ते तडजोड करायला तयार नाहीत. नुकतेच म्हणजे गेल्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी पंतप्रधान इंदिरा गांधींनी आसाम राज्याची पुनर्रचना करण्याचे आश्वासन दिले. तेवढ्या आश्वासनाचा धागा पकडून आपली मागणी मान्य झाल्याचे हे पहाडी नेते आग्रहाने सांगत आहेत. आणि

# पुढे काय करणार आहेत ?

पुनर्रचनेचा सारा तपशील अद्याप तयार व्हायचा आहे. उगाच अधीरेपणाने आधीच निष्कर्ष काढण्यात काय अर्थ आहे, असे इशारे आसामातील इतर नेते देत आहेत.

पुनर्रचनेचा तपशील अद्यापही ठरायचाच आहे. तो जेव्हा ठरायचा असेल तेव्हा ठरो, पण आसामातील या पहाडी लोकांचे पुरेसे समाधान केल्याशिवाय आसाम राज्याच्या पाचवीला पुजलेल्या या कायमच्या कटकटी कधीच थांबणार नाहीत आणि राज्याला स्वस्थता लाभणार नाही. त्यांचे समाधान करण्याचा एकच मार्ग म्हणजे त्यांना देशातील इतर भाषिक गटांप्रमाणेच पुरेशी स्वायत्तता देऊन त्यांच्यावरील अन्याय दूर करणे. आसामच्या सध्याच्या बिघडलेल्या परिस्थितीत सर्व दृष्टींनी हाच एक सुरक्षित उपाय आहे. आसामातील पहाडी प्रश्नांची, पहाडी लोक, मैदानी लोक यांच्या परस्परसंबंधांची तपशीलवार प्रत्यक्ष माहिती घेतल्यावर आणि अनेक जणांशी चर्चा केल्यावर माझे असे प्रामाणिक मत झाले आहे.

भारतातील इतरही राज्यांत पहाडी जिल्हे आहेत आणि पहाडी जमातीही आहेतच, पण आसामातील परिस्थिती अगदीच वेगळी आहे! नेफाचा आणि नागालँडचा भाग सोडला तर आसामातील एकूण क्षेत्रफळाच्या सुमारे अर्धा भाग पहाडांनी व्यापला आहे. या डोंगरी भागात वस्ती करून राहणाऱ्या असंख्य वन्य आणि पहाडी जमाती युगायुगांच्या दूरत्वानंतर आता एकाएकी आधुनिक संस्कृतीच्या तडाख्यात सापडल्या आहेत. त्यांच्या समस्या निराळ्या आहेत, आणि म्हणून त्यांच्या समस्यांवरील तोडगेही वेगळेच असले पाहिजेत.

आसामची डोकेदुखी होऊन बसलेले हे पहाडी प्रदेश म्हणजे गारो पहाडी जिल्हा, युनायटेड खासी-जैनतिया पहाडी जिल्हा, युनायटेड मिकीर व उत्तर काचार पहाडी जिल्हा आणि मिझो पहाडी जिल्हा. आसामच्या ४७,०९८ चौरस मैलांपैकी २१,७३२ चौरस मैल या जिल्ह्यांनी व्यापले आहेत. पण आसामच्या एकूण १ कोटी २० लाख लोकसंख्येपैकी अवघी १४ लाख वस्ती या प्रदेशांमध्ये आहे. आसामच्या दक्षिण भागात असलेले हे पहाडी जिल्हे पूर्व पाकिस्तानच्या किंवा ब्रह्मदेशाच्या सीमांवर आहेत. मिझो जिल्हा तर पाकिस्तान आणि ब्रह्मदेश या दोन देशांच्या बेचक्यात बसल्यासारखा आहे.

प्रत्येक जिल्हा आणि टेकड्या त्या त्या ठिकाणी राहणाऱ्या जमातींच्या नावाने ओळखले जातात. गारो टेकड्यांमध्ये राहणारे गारो लोक, खासी आणि जैनतिया टेकड्यांमध्ये राहणारे खासी लोक आणि जैनतिया लोक, उत्तर काचार व मिकीर जिल्ह्यातील काचारी जमाती आणि मिकीर जमाती आणि मिझो टेकड्यांमधील मिझो लोक. सारे वांशिकदृष्ट्या भिन्न भिन्न प्रकारचे लोक आहेत. त्यांचे चेहरे वेगळे, कपडे वेगळे, चालीरीती वेगळ्या, संस्कृती वेगळी आणि भाषाही एकमेकांपासून वेगळी. एका खासी माणसात आणि आसामच्या मैदानी माणसात जेवढा फरक आहे तेवढाच फरक खासींमध्ये आणि गारोंमध्ये आहे. आसामातील या टेकड्या अत्यंत वैचित्र्यपूर्ण समजल्या जातात त्या याच कारणांमुळे! परंतु या वैचित्र्यामुळेच आसाममधील प्रश्नांचा गुंताही वाढत जातो हेही खरे आहे.

भारतातील बाकीच्या वन्य जमातींचा इतिहासकालापासून अन्य नागरी संस्कृतींशी संबंध येत होताच. व्यापाराच्या निमित्ताने, धर्माच्या निमित्ताने, युद्धाच्या निमित्ताने कुठेतरी देवाणघेवाण होत होतीच. त्यामुळे त्यांच्यांत हळूहळू बदल होत होता. त्यांच्यांतले काही लोक नांगरून शेती करण्याचे तंत्र शिकून स्थायिक कृषीव्यवसायी होत होते. बाह्य संस्कृतीचा त्यांच्यावर पडणारा प्रभाव हा विकासाच्या दिशेने पडत होता.

आसामच्या या पहाडी प्रदेशांमधील परिस्थिती मात्र वेगळी होती. इतिहासकाळात या पहाडी जमातींचे नागरी लोकांशी संबंध येत होते, पण ते अगदी माफक. त्यांची स्वतःची पहाडी राज्ये भरभराटीला आली होती. त्यापैकी काचारी जमातीने तर एकेकाळी आसामच्या बऱ्याच मोठ्या भागावर प्रभुत्व गाजविले होते. परंतु या पहाडी जमाती आणि आसाममधील नागरी लोक यांचे घनिष्ट संबंध कधीच आले नाहीत. किरकोळ व्यापाराच्या निमित्ताने जेवढा येत असेल तेवढाच काय तो संबंध. आधुनिक संस्कृती आसामच्या मैदानांमध्ये शिरली तरी तिने नैसर्गिक पद्धतीने आसामची जंगले आणि पहाड ओलांडलेच नाहीत. या जमातींमध्ये आधुनिक नव्हे अत्याधुनिक संस्कृती शिरली ती अगदी वेगळ्याच मार्गाने अचानक रीतीने.. आणि

या जमातींच्या परंपरागत संस्कृतीचा नायनाट करीत. जुनी जीवनमूल्ये मारून काढीत !

## स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची जोपासना

कारण या वन्य जमाती इतर नागरी लोकांच्या दृष्टीने जरी मागासलेल्या होत्या तरी त्यांनाही 'स्वतःची संस्कृती होती...स्वतंत्र अभिजात 'सौंदर्यदृष्टी होती. परंपरेने पोसलेली जीवनमूल्ये होती. त्यांचे नाच, त्यांची गाणी, वस्त्रे विणण्याची त्यांची कला, शासनाच्या त्यांच्या पद्धती या साऱ्यांमध्ये त्यांच्या निकोप संस्कृतीचे प्रतिबिंब दिसत होते.

ब्रिटिशांनी १८७४ साली आसाम प्रांत ब्रिटिश साम्राज्याला जोडला. आणि आसाममध्ये इतर भारतीयांचे लोंढेच्या लोंढे उपजीविकेसाठी लोटू लागले. व्यापाऱ्यांच्या पलटणी आसामच्या वेगवेगळ्या भागांत आपापला माल खपविण्यासाठी घुसू लागल्या. रस्ते होऊ लागले. आसामचा इतर भारताशी निकटचा संबंध येऊ लागला आणि आसामातील या पहाडी जमातींचा नागरी संस्कृतीशी येणारा संबंध वाढू लागला. नागरी संस्कृतीच्या लाटा भराभर एकामागून एक या पहाडी जीवनावर येऊन आदळू लागल्या. याचा परिणाम काय झाला, ते पुढे कळेलच.

आसाम प्रांत साम्राज्यात सामील झाल्याबरोबर ब्रिटिश सरकाराने प्रांतातील सारे जिल्हे शेड्यूल्ड डिस्ट्रिक्ट्स म्हणून जाहीर केले. मागासलेल्या लोकसंख्येच्या संरक्षणासाठी खास शासनाची व्यवस्था करण्यासाठी या शेड्यूल्ड डिस्ट्रिक्टस्चा कायदा ब्रिटिश सरकारने तयार केला होता. अर्थात लवकरच साऱ्या आसामला इतर प्रांतांच्या बरोबरीचे स्वरूप प्राप्त झाले. पण आसामातील पहाडी प्रदेशांचा वेगळेपणा ओळखून या पहाडी प्रदेशांना इतर भागांतील कायदे लागू पडू नयेत, अशी तरतूद केली. अशी तरतूद करण्यामागे या पहाडी अविकसित जमातींची सुधारलेल्या लोकांकडून पिळवणूक होऊ नये, त्यांना संरक्षण मिळावे आणि त्यांच्याच परंपरागत नियमाप्रमाणे राज्यकारभार होऊन नैसर्गिक रीतीने होणारा त्यांचा विकास अधिक वेगवान करावा हे ब्रिटिश सरकारचे उद्देश होते.

या प्रदेशांना दिलेल्या 'मागासलेले भाग' या नावावर आणि या वृत्तीवर फार टीका झाल्याने सरकारने या पहाडी जमातींना आणि प्रदेशांना अलग काढले. आणि त्यांचे 'एक्सक्लूडेड एरियाज' आणि 'पार्शलीएक्सक्लूडेड एरियाज' असे दोन भाग पाडले. ब्रिटिश सरकारने त्या वेळी अवलंबिलेल्या या धोरणावर बरीच टीका होते. या धोरणामुळे या जमाती साऱ्या भारतीय जीवनापासून अलग ठेवून त्यांच्यांत वेगळेपणाची भावना निर्माण करण्यात ब्रिटिशांनी यश मिळविले, अशी टीका केली जाते. परंतु सांगोपांग विचार करता या टीकेत विशेष अर्थ नाही असे दिसून येते. एकतर या जमातींचा पूर्वी भारतीय जीवनाशी फारसा संबंध आलाच नव्हता. ब्रिटिशांनीच तो आणला. आणि हे भाग इतर शासनापासून वेगळे ठेवण्याचा हेतू

प्रामाणिक होता. ज्या सायमन कमिशनने हे भाग अलग ठेवण्याची सूचना केली होती त्या कमिशनने आपल्या अहवालात म्हटले होते की, " या भागात राहणाऱ्या जमातींच्या विकासाची पायरी अशी आहे की इतर भागांतील लोकांप्रमाणे त्यांना लोकसंख्येनुसार प्रतिनिधित्व देणे शक्य नाही. त्यांना स्वयंनिर्णय नको आहे. त्यांना आपल्या जमिनींचे संरक्षण हवे आहे. आपल्या परंपरागत पद्धतीने आणि चाली-रीतीने जीवन जगण्याची मुभा त्यांना हवी आहे. वेगाच्या राजकीय प्रगतीमुळे त्यांना समाधान होण्यापेक्षा सहानुभूतीपूर्ण वागणुकीने आणि त्यांच्या शेजाऱ्यांकडून त्यांचे होणारे आर्थिक शोषण थांबविल्यानेच त्यांचे अधिक समाधान होऊ शकेल.

—" परंतु तेवढयानेच त्यांच्याविषयीची सरकारी जबाबदारी संपणार नाही. शासनाचे प्रमुख कर्तव्य या लोकांना शिक्षण देऊन हळू हळू त्यांना त्यांच्या पायावर उभे करणे हे आहे—"

## सिक्स्थ शेडयूल

जा जमातींचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व कायम ठेवून त्यांचा विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने हे धोरण योग्यच होते. भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर याच उद्देशाने भारत सरकारनेही या भागांना काही काळ ' अलग ' ठेवण्याचे धोरण स्वीकारले. आधुनिक संस्कृतीच्या हिंसक आक्रमणापासून या जमातींना वाचविण्यासाठी हे धोरण कसे योग्य होते हे पुढे कळेलच. पण या धोरणाबद्दल भारतात सर्वत्रच तीव्र नापसंती व्यक्त झाली. लोकसभेमध्ये आणि आसाम विधानसभेमध्ये या प्रश्नावर वादळे माजली. राजकीय कारणापेक्षा सामाजिक कारणांसाठीच या भागांना वेगळे ठेवण्यात आले. भारत सरकारतर्फे असे सांगण्यात आले की, ज्या लोकसंस्था, जे कायदे प्रगत लोकांना उपयुक्त ठरतात त्याच संस्था आणि ते कायदे या अप्रगत लोकांवर एकदम लादले तर त्यामुळे या अप्रगत समाजांची पिळवणूक होण्याचाच धोका अधिक असतो. अमेरिकेत आणि आफ्रिकेत हेच घडले.

एक्सक्लूडेड एरियाजमध्ये आसाममधील नागा टेकडया, नॉर्थ ईस्ट फ्रॉंटियर भाग, मिझो टेकडया आणि उत्तर काचार टेकडया हा भाग येत होता तर पार्शली एक्सक्लूडेड एरियाजमध्ये गारो टेकडया, खासी, जैनतिया टेकडया, मिकीर टेकडया हा भाग येत होता.

स्वातंत्र्यानंतर नवी घटना येईपर्यंत ही पद्धत तशीच चालू राहिली. घटनेमध्ये सुप्रसिद्ध ' सिक्स्थ शेडयूल 'नुसार आसामच्या या पहाडी विभागासाठी खास तरतूद करण्यात आली. या शेल्डयूलनुसार या विभागांना थोडीशी स्वायत्तता देण्यात आली. आणि आसाम राज्यांतर्गत त्या त्या विभागांच्या जिल्हा मंडळांमार्फत कारभार चालू लागला.

या शेडयूलचेही दोन विभाग होते. अ विभागानुसार गारो, खासी-जैनतिया, उत्तर काचार-मिकीर, मिझो, नागा टेकडयांचा काही भाग यांना राज्यांतर्गत स्वायत्त

जिल्हा मंडळे देण्यात आली तर ब विभागानुसार नेफा आणि नागा टेकड्यांमधील तुअेत संग भाग हे प्रदेश आसामच्या गव्हर्नरांच्या अखत्याराखाली आले. विभागांची पुरेशी प्रगती होताच त्यांनाही अ विभागासारखी स्वायत्त जिल्हा मंडळे देण्याचे ठरले.

या सहाव्या शेड्यूलवर सतत टीका होत आली आहे. मैदानी लोकांकडून आणि पहाडी जमातीकडूनही. जनसंघासारख्या पक्षाचे म्हणणे असे की हे सहावे शेड्यूल संपूर्ण बाद करून इतर मैदानी लोकांप्रमाणेच या जमातींना वागवावे, तर या जमातींचे म्हणणे असे की हे सहावे शेड्यूल आमच्या विकासाला, आमच्या रक्षणाला पुरेसे नाही. आम्हांला अधिक स्वायत्तता हवी. वेगळे राज्यच हवे.

परंतु आर्थिक व सांस्कृतिक संरक्षणाच्या दृष्टीने व शिक्षणाच्या दृष्टीने या शेड्यूलमुळे बराच फायदा झाला आहे हे नाकबूल करून चालणार नाही. शेड्यूलनुसार या जिल्ह्यांची स्वायत्त मंडळे जिल्ह्यांतून निवडून आलेल्या २४ सभासदांची असतात. शेती, जंगले, शिक्षण, सामाजिक कायदे, गुन्हेगारी, कायदे यांबाबत या जिल्हा मंडळांना बरेच अधिकार आहेत.


आसामातील जमातींचा हा जो संक्षिप्त पण कंटाळवाणा वाटणारा आधुनिक राजकीय इतिहास सांगितला तो पुढील घटना समजावून घेण्यासाठी आवश्यक आहे म्हणून. या इतिहासाची थोडीशी कल्पना आल्याशिवाय आसामातील पहाडी प्रदेशात नाजूक प्रश्नांची गुंतागुंत सहजासहजी उकलता येणार नाही.

## हे मिशनरी . . .

ब्रिटिश सरकारची या भागासंबंधी वागणूक समंजसपणाची होती. भारत सरकारही या लोकांच्या अस्मितेला धक्का न लावता अतिशय समजूतदारपणे त्यांच्याशी वागत आहे. मग बिघडले कुठे, एवढा गुंता कसा झाला, चूक झाली तरी कुठे आणि कुणाची ? पूर्ण उमललेल्या नाना रंगांच्या बहुविध फुलांची जिथे बाग फुलायची अपेक्षा होती तिथे संशयी आणि हट्टी नेत्यांची, गनिमी योद्ध्यांची काटेरी जंगले कशी उभी राहिली ! हे झाले तरी कसे ? याला जबाबदार कोण ?

" हे मिशनरी, रक्त शोषून घेणारे आमचे मैदानी व्यापारी, आमचे उद्दाम राज्यकर्ते आणि सांस्कृतिक वर्चस्वाची भावना बाळगून त्यांना तुच्छ लेखणारे आम्ही मैदानी लोक–"

वन्य जमातींच्या प्रश्नांचा थोडा तपशीलवार अभ्यास केलेले एक समाजशास्त्र–अभ्यासक श्री. एस. एस. मोहिले हे माझ्याशी बोलताना या साऱ्यांनाच दोषी धरत होते. मोहिले हे एका व्यापारी कंपनीत नोकरीला आहेत आणि केवळ हौसेने ते वन्य जमातींच्या प्रश्नांचा अभ्यास करीत आहेत. आणि त्यांचे म्हणणे थोडे खरेही होते. केवळ भारतातच नव्हे तर साऱ्या जगात ज्या ज्या ठिकाणी वन्य जमातींचा नागरी आधुनिक संस्कृतींशी अचानकपणे संबंध आला त्या त्या सर्व ठिकाणी अशा समस्या निर्माण झाल्या. एकतर त्या वन्य जमाती संपूर्णपणे नष्ट तरी झाल्या; किंवा त्यांची संस्कृती-




तरी पूर्णपणे नष्ट होऊन गुलामी वृत्तीने या जमाती कशाबशा तग धरून राहिल्या. आसामात एवढी टोकाची प्रतिक्रिया घडली नाही हे खरे.

आसामच्या पहाडी प्रदेशात शिरलेल्या ख्रिश्चन मिशनऱ्यांनी फार मोठे काम केले. त्यांनी या दुर्लक्षिलेल्या जमातींना शिक्षण दिले. अनेक हालअपेष्टा सोसून त्यांना वैद्यकीय मदत दिली. नव्या जगाचे त्यांना दर्शन घडविले. त्यांच्या जीवनात त्यांनी मोठी भौतिक क्रांती घडवून आणली. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी या जमातींवर करून ठेवलेले हे उपकार कुणालाही मान्य करावेच लागतील.

या मागासल्या समजल्या जाणाऱ्या जमातींनी मिशनऱ्यांच्या मदतीने शिक्षणाच्या बाबतीत इतकी प्रगती केली आहे की सुशिक्षितांची टक्केवारी खूपच जास्त आहे. मिझो आणि खासी जिल्ह्यात सुशिक्षितांचे प्रमाण ४५.५ टक्के आहे.

परंतु ही जमेची बाजू पाहिल्यानंतर थोडी ऋण बाजूही पाहावयास हवी. मिशनऱ्यांनी ख्रिश्चन धर्माची ध्वजा या जमातींमध्ये नेली, चर्चेस नेली, क्रूस नेले. मिझो, नागालँड यांसारख्या जिल्ह्यांमध्ये ९० टक्क्यांपर्यंतच्या लोकांना ख्रिश्चन धर्माची दीक्षा दिली. इतर पहाडी जिल्ह्यांतही मोठ्या प्रमाणात येशूचे अनुयायी केले.

**पण त्याचबरोबर या लोकांचा आदिधर्म, त्यांची संस्कृती, त्यांची जीवनमूल्ये, त्यांच्या चालीरीती, त्यांची सौंदर्यदृष्टी, त्यांची गाणी, त्यांची नृत्ये यांना पार गाडून टाकले.**

आजूबाजूच्या निसर्गाला अनुरूप असलेल्या त्यांच्या रंगमय वस्त्राप्रावरणांना तुच्छ लेखून त्यांना कोट-पँट चढवून अर्धवट साहेब बनविले आणि वस्त्रे विणण्याची त्यांची कला मारून मैदानीं व्यापाऱ्यांवर वस्त्रासाठी अवलंबून राहण्यास शिकविले. त्यांची गाणी, त्यांची नृत्ये असंस्कृत म्हणून त्यांना टाकून द्यायला लावली. त्यांच्या तरुण पिढीत जुन्या संस्कृतीविषयी तिरस्कार निर्माण केला आणि नव्या नागरी संस्कृतीची द्वारे खुली करून दिली; पण तीमधील अधःपातांच्या मार्गापासून त्यांना परावृत्त केले नाही. जो नागा किंवा मिझो किंवा खासी- तरुण पूर्वीच्या आपल्या नैसर्गिक वस्त्राप्रावरणांमध्ये पहाडांचा राजा भासत होता तोच आता नव्या साहेबी थाटाच्या फाटक्या कपड्यांसाठी गुलामासारखा जीव टाकू लागला. जुन्या संस्कृती-विषयी, चालीरीतींविषयी, नीतिनियमांविषयी तिरस्कार निर्माण केला गेल्यामुळे नीतीची बंधने तुटली आणि आधुनिक संस्कृतीतील सर्व खाचखळगे त्याच्या जीवनात आले. आपल्यासारखे साहेबी कपडे न घालणाऱ्या जातबांधवांना तो तुच्छ लेखू लागला.

या सर्व गोष्टींची मोठी जबाबदारी मिशनऱ्यांवरच येते हे खरे आहे. या विधानांना पूर्वग्रहदूषित असल्याचा वास येण्याचे कारण नाही. त्यासाठी काही ख्रिश्चनांचाच दाखला दिलेला बरा.

पूर्वायुष्यात ख्रिश्चन मिशनरी असलेले व पुढे भांडण होऊन ते कार्य सोडून दिलेले डॉ. व्हेरियर एल्विन यांनी भारतातील वन्य जमातींचा फार जवळून व तपशीलवार अभ्यास केला आहे. आसाममधील वन्य जमातींचाही त्यांचा सूक्ष्म अभ्यास आहे. परकीय ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या प्रचारामुळे या जमातींचे कसे नुकसान होते यावर त्यांनी ठिकठिकाणी सडकून टीका केली आहे.

डॉ. एल्विन एका ठिकाणी म्हणतात, " मिशनऱ्यांच्या सामाजिक किंवा धार्मिक सुधारणांच्या कार्यावरील एक मूलभूत आक्षेप हा आहे की त्यामळे **लोकांचा स्वतः वरील विश्वास उडतो. परंपरागत श्रद्धा आणि चालीरीती यांची हे मिशनरी एवढी निंदा करतात की, त्यामुळे जे धर्मांतर करीत नाहीत त्यांच्यांतही न्यूनगंडाची भावना निर्माण होते. जे जे वन्य जमातींचे आहे ते ते सारे घाणेरडे किंवा मागासलेले, असे सतत सांगत राहिल्याने त्या लोकांमध्ये एक तऱ्हेची विफलता आणि उद्विग्नता निर्माण होते. "**

पुढे एके ठिकाणी फादर एल्विन म्हणतात, " प्रत्यक्षात असे आढळून आले आहे की, परकीय मिशनच्या कार्याचा परिणाम म्हणून पूर्व भारतातील वन्य जमातीं-मध्ये भारतापासून किंवा आपल्याच लोकांपासून अलग होण्याची फुटीर प्रवृत्ती निर्माण झाली आहे. ख्रिश्चन आणि 'काफिर', येशूचे अनुयायी आणि नरकाला जाणारे असे ख्रिश्चन धर्माशी विसंगत भेदभाव पाडून ख्रिश्चनांनी बिगर ख्रिश्चनां-पासून अलग राहावे हे शिकवले जाते. त्यामुळे वेडी फुटीर प्रवृत्ती निर्माण होणे

अपरिहार्य होऊन बसते. सामाजिक जीवनात आणि राजकारणातही अशा प्रवृत्तीनें डोके वर काढलेले आहे. याचा राजकीय परिणाम असा होतो की या लोकांचा भारताविषयीचा आणि भारतीय संस्कृतीविषयीचा आपलेपणा कमी होतो. आणि सामाजिक परिणाम असा होतो की आपल्याच ग्रामीण बांधवांपासून ते दूर लोटले जातात..."......

ब्रिटिश सरकार काही ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या विरुद्ध नव्हते. उलट मिशनऱ्यांना सरकारचा पाठिंबाच असायचा. परंतु सांस्कृतिकदृष्ट्या मिशनरी प्रचाराचा या वन्य जमातींवर किती हिंसक परिणाम होतो याचे तपशीलवार वर्णन १९३१ च्या भारतीय शिरगणतीच्या अहवालातच केलेले आहे. हटन, मिल्स्, हैमनडॉर्फ यांसारखे वन्य जमातींचा अभ्यास केलेले पंडितही परकीय पाश्चात्त्य संस्कृती या जमातींवर मिशनऱ्यांनी लादल्यामुळे त्यांचा जो ऱ्हास होतो त्यावर कडक टीका करतात.

आसामच्या वन्य जमातींत अमेरिकन बाप्टिस्ट मिशनचे फार मोठे प्रस्थ आहे. या मिशनने दूरदूरच्या दुर्गम ठिकाणी शाळा, रुग्णालये, चर्चेस काढून लोकांना सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत. १९४१ सालच्या शिरगणतीप्रमाणे आसामातील ख्रिश्चनांची संख्या अवघी ६९,१४८ एवढीच होती. १९६१ च्या अहवालानुसार हीच संख्या, ७,६४,५५३ वर गेली. धर्मांतराचा हा वेग प्रचंड आहे. विशेषत:, हे धर्मांतर पहाडी प्रदेशांत जास्त होते. पहाडी प्रदेशाच्या एकूण लोकसंख्येच्या मानानें ख्रिश्चन धर्मीयांची लोकसंख्या जरी कमीच वाटली तरी वस्तुस्थिती तशी नाही. कारण इतर लोक आपल्या आदिधर्माचीच पूजा बांधीत असल्याने व हे धर्मांतरीत ख्रिश्चन अधिक प्रगत आणि सुशिक्षित असल्यानें तेच या पहाडी प्रदेशाच्या जीवनावर वर्चस्व गाजवितात.

## शहरी पिळवणूक

दुर्दैवाने आसामातील एखाद्या मिशनऱ्याशीं या प्रश्नावर चर्चा करण्याची संधी मला मिळाली नाही. कारण मिशनरी स्वत: या विषयावर मुळीच बोलत नाहीत निदान माझा तरी अनुभव तसा आहे. शिलाँगमधील एका मिशनऱ्याला मी बोलते करण्याचा प्रयत्न केला. पण पत्रकार आहे असे समजताच त्याने आपले तोंड शिवून घेतले आणि नाव सांगण्याचेही टाळून तो पसार झाला.

व्यापाऱ्यांनी या वन्य जमातींना भरपूर पिळले. मैल न् मैल जंगले आणि पहाड तुडवीत डोक्यावरून वाहून आणलेल्या मधाच्या बरण्यांच्या मोबदल्यात थोडेसे मीठ देणे, कवडीमोल किंमतीचे रंगीत मणी देणे किंवा जाडीभरडी रंगीत कापडे देणे असे प्रकार त्यांनी सुरू केले. अज्ञानाचा फायदा उठवला. स्वस्त आधुनिक वस्तूंची त्यांना चटक लावून त्याच्या मोबदल्यात त्यांनी जंगलची संपत्ती लुटली. जसजसे दिवस गेले, वन्य जमाती अधिक शिक्षित होऊ लागल्या, तसतसे त्यांना आपली शुद्ध

पळवणूक होत असल्याचे कळू लागले. आणि मैदानी लोकांविषयीचा संशय वाढू लागला.

संशय आणि द्वेष वाढायला आणखी एक कारण होते. या वन्य जमातींमधील स्त्रिया दिसायला अतिशय सुरेख आणि आरोग्यसंपन्न असतात. पूर्वीच्या काळात मैदानी विभागातील एखादा मैदानी अधिकारी या पहाडी विभागात गेला की तो तेथील सारी संपत्ती आपल्याच मालकीची समजायचा. चार पैसे टाकले की कोणतीही पहाडी स्त्री मिळते ही त्याची समजूत आणि त्या गुर्मीत तो वागायचा. अजूनही बऱ्याच जणांची दृष्टी तशी असते. या जमाती फार स्वाभिमानी असतात. परस्परांचा मान-आदर ठेवण्याची त्यांची प्रवृत्ती असते. पण पहाडी नेत्यांच्या प्रमुखांनाही, त्यांचा कधी शहरांशी संबंध आला तर तेथील कचेरीतील नोकर त्यांना तुच्छतेने वागवितात. या जमातींना सर्वांकडून बरोबरीची वागणूक अपेक्षित असते. असले प्रकार पाहून त्यांचा संशय, मैदानी लोकांविषयीचा त्यांचा द्वेष वाढतच होता.

या साऱ्या चमत्कारिक परिस्थितीवरून या जमातीची वेगळेपणाची भावना वाढत होती. मिशनरी प्रचाराचे या भावनेला खतपाणी मिळत होतेच. त्यामुळेच भारताला स्वराज्य मिळण्यापूर्वी या पूर्व भारतातील वन्य जमातींचे काय करावे, असा ब्रिटिशांपुढे प्रश्न होता. या सर्व वन्य जमातींचे मिळून बनलेले असे—ज्यामध्ये नेफा, नागालँड आणि आसामचा सर्व डोंगरी भाग येईल असे—एक वेगळे राज्य निर्माण करून ते ब्रिटिश शासनाखालीच राहावे असा काहींचा प्रयत्न होता. पण तो हाणून पाडण्यात आला.

स्वातंत्र्यानंतर शासकीय दुर्वर्तनामुळे या वन्य जमातींची निराशा वाढतच गेली. आणि आपले डोंगरी राज्य आसामपेक्षा वेगळे असावे, अशी भावना वाढू लागली. या भावनेला चळवळीचे स्वरूप आले ते १९५४ साली राज्यपुनर्रचना मंडळ आसाममध्ये पाहणीसाठी गेले तेव्हा! परंतु ही मागणी मान्य झाली नाही. त्यामुळे ईस्टर्न इंडिया ट्रायबल युनियनने १९५७ च्या निवडणुकीत आसामच्या डोंगरी भागात काँग्रेसचा पार धुव्वा उडविला. युनियनच्या प्रतिनिधींना आसाम मंत्रिमंडळात स्थान मिळाले. १९६० साली आसामी भाषा जेव्हा राज्यभाषा झाली तेव्हा त्याच्या निषेधार्थ पहाडी नेत्यांनी सरकारातून अंग काढून घेतले.

१९६० सालीच सध्याच्या ऑल पार्टी हिल लीडर्स कॉन्फरन्सची स्थापना झाली. डोंगरी लोकांच्या मागणीची तीव्रता ध्यानी घेऊन पं. नेहरूंनी स्कॉटिश पद्धतीची स्वायत्तता डोंगरी जिल्ह्यांना देण्याची योजना तयार केली. पण ती या कॉन्फरन्सने स्वीकारली नाही आणि १९६२ च्या निवडणुकांमध्ये काँग्रेसला पुन्हा जोराचा तडाखा दिला. डोंगरी भागातील १५ जागांपैकी ११ जागा डोंगरी नेत्यांनी जिंकल्या. आणि फक्त नॉर्थ काचार व मिकीर या शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या जिल्ह्यांतील

४ जागा काँग्रेसने जिंकल्या. १९६७च्या निवडणुकीतही हुबेहूब हीच परिस्थिती झाली.

१९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत भाग घ्यायचा नाही असे या डोंगरी नेत्यांनी ठरविले होते आणि आपली मागणी पुढे रेटण्यासाठी सर्व डोंगरी जनतेनेही निवडणुकीवर बहिष्कार टाकावा असे आवाहन केले होते. डोंगरी नेत्यांची आपल्या अनुयायांवरील पकड जबरदस्त आहे. आपल्या मागणीसाठी १७ जानेवारी १९६७ पासून अहिंसक चळवळही सुरू करण्याचे या नेत्यांनी ठरविले होते.

त्यामुळे आसामच्या डोंगरी भागात निवडणुका न होता भलतीच परिस्थिती निर्माण व्हायची या धास्तीने केंद्र सरकारने काही घाईच्या हालचाली केल्या. पंतप्रधानांनी डोंगरी नेत्यांच्या शिष्टमंडळाला भेटीसाठी बोलाविले. त्यांच्याशी चर्चा केली आणि निवडणुकीनंतर आसामची फेडरल धर्तीवर पुनर्रचना करू असे आश्वासन दिले.

तेवढ्या आश्वासनाचा धागा पकडून आपली मागणी जवळ जवळ मान्य झाल्याचे डोंगरी नेत्यांनी जाहीर केले आणि निवडणुका लढविल्या.

"आता ' जर तर 'चा प्रश्नच नाही. आमची मागणी मान्य झाली आहे. आणि आम्हांला हवे ते आम्ही मिळविणारच." ऑल पार्टी हिल लीडर्स कॉन्फरन्सचे सेक्रेटरी श्री. स्टॅन्ले निकोल्स रॉय हे जे आत्मविश्वासाने सांगत होते, त्यामागे ही भूमिका होती.

पण खरोखरच त्यांची मागणी अजून पूर्णत: मान्य झाली आहे काय? आणि ती मान्य झाली नाही तर हे डोंगरी पुढारी पुढे काय करणार आहेत?

[ अपूर्ण ]


लाल महाल प्रतापगड पन्हाळगड

राजगड पुरंदर आग्रा

मुजऱ्याचे मानकरी

लेखक : ब. मो. पुरंदरे : मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण पेठ, पुणे २

ज्वलंत राष्ट्रवादाच्या

भयानक दीप्तीचा

ललितभव्य आलेख

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

मूल्य पंचवीस रुपये

'माणूस'मधून प्रसिद्ध झालेल्या
प्रदीर्घ लेखमालेची सुधारित ग्रंथावृत्ती.

राजहंस प्रकाशन,

४१९ नारायण पेठ, पुणे-२.

पुस्तकें

# शांभवी

## निशिकांत मिरजकर

मराठी कवितेने आज पुष्कळच नावीन्य-पूर्ण उन्मेष धारण केले आहेत. तिचे व्यक्तिमत्त्व आगळे वनू लागले आहे. स्थूल नि सूक्ष्म, जाणीव आणि नेणीव, प्रकटन व आच्छादन, वास्तवता आणि सूचकता या दोन्ही तीरांना स्पर्श करीत तिचा प्रवाह चाललेला आहे.

त्या मानाने रॉक कार्व्हालो यांची 'शांभवी' थोडी जुन्या सुरईतली वाटते. मराठी कवितेच्या आता अंगवळणी पड-लेल्या नवप्रचीतीच्या काही खुणा ती धीटपणे चाचपून पाहते. पण एकंदरीत तिची प्रकृती थोड्या मागच्या पायरी-वरच थबकलेली. तिथूनच नव्या जाणि-वांना ओठंगून पाहणारी. हे ओठंगलेले स्वरूप बऱ्याच वेळा मोहक वाटते, खुलते, मनाला आवडतेही. पण तितकेच. ते हृदयाशी भिडत नाही, ठसा उठवत नाही बैचैन करीत नाही.

श्री. कार्व्हालो यांच्या कित्येक कविते-तून मोहक भाषेचा अगदी लाडिक ओघ आढळतो ! शांभवीसारखा !

**" स्वातीघरची**
**मोतिरसाची**
**लेवुन कांती**
**उधाणराती,**
**रौप्यरेशमी**
**ओघळले मी "**

# काही रिझविणाऱ्या कविता

अशासारखे गोजिरे शब्द एकामागोमाग वळसे घेतात. त्यांचे कमानदार आकृतिबंध घडतात. क्वचित त्यांवर कला कुसरही उमटते. पण अनुभूती रसरसत नाही. उत्कटता उचंबळत नाही.

**" दुरुन कुठुनशा यउन अवचित**
**मला बिलगल्या तुझ्या सावल्या ! "**
**" तुझ्या दृष्टिचा मिळता मुजरा**
**लाजुन वळल्या नाजुक नजरा "**
**" माय मराठी, हिच्या ललाटी**
**वैभवरेषा चिरजयवंती**
**ज्वलंत आहे इथे अस्मिता,**
**गुलाल आहे इथली माती ! "**

यांसारखा काही ठिकाणी त्या उत्कटतेचा स्पर्श घडतो. कवीची साक्षात प्रतीती फेसाळून उठलेली दिसते. पण त्यात सातत्य नाही, सलगता नाही. आत्मविश्वास नाही ! कार्व्हालो यांची कविता अजून बरीच लाजत, संकोचत पावले टाकते. प्रमदेचे अनुकरण करावयास जाते नि मधेच किशोरीसारखी बुजते, बावरते. 'प्रतीति' याच शीर्षकाच्या कवितेत याचे उदाहरण दिसेल. मदालसेच्या सलज्ज सौंदर्याच्या धीट प्रत्ययाने प्रारंभीच उत्सुकतेची कमान एकदम उंचावते; पण अपेक्षेचा तोलच राहत नाही. 'कधीमधी तरि कंप उठावा' आणि तो 'वृक्षावरती प्रतीत व्हावा' अशी गुळमुळीतपणे सरपटून कविता संपून जाते. अशा कितीतरी कविता ! कवीच्या प्रतिभेला चमक आहे, झेप आहे हे जाणवून देणाऱ्या, पण तिच्या अनुभूतीचा आवाका पेलून न धरणाऱ्या वर्णनांत, संवेदनांत, प्रत्ययांत थिटच्या पडणाऱ्या. (त्यामुळेच मग 'अधीरलेल्या जिवण्या जुळल्या' तरी 'उत्सुकतेच्या तरल कल्पना' व 'अननुभूतीच्या मुग्ध वेदना' घडीभर पुलकित झाल्याचाच माफक प्रत्यय येतो. 'मनगटात लागतो भिनावा रस लोहाचा तप्त' अशी थरारणारी अनुभूती आली तरी त्यासाठी लांबलचक यादी करून तिचे वैशिष्ट्य जिवंत राखण्याकडे दुर्लक्ष होते. 'फुटके प्रीतिरसाचे प्याले मुखाला लावून तुझे ओठ ओले होणार नाहीत' यांसारखी सुरेख कल्पना व्यक्त केल्यानंतर 'नुरता परि लागेबांधे का लागतेस मागे ?' यांसारख्या गद्यप्राय ओळींतील शेवटच्या शब्दांच्या काव्यहानिकारकतेलाही वाव मिळून जातो. अशी अनेक उदाहरणे.)

कित्येक ठिकाणी मात्र रॉक कार्व्हालो यांची मुग्ध प्रतिभा रेखीव वर्णन करता करता फार सुंदर समासोक्ती साधून जाते. अर्थाच्या पाकळ्या त्यामागे उभ्या राहतात. वाचता वाचता क्षणभर रेंगाळावेसे वाटते. क्षितिजाची सीमा स्पर्शून हळूच

पळणाऱ्या रजनीचे—

> “ वस्त्र तिचे लज्जारंगी
> मागे परि तरल हुळहुळे ”

हे वर्णन, किंवा

> “ पडद्यास कशी खिडकीच्या
> आज अवकळा आठवली
> सरकुन बाजुस जरा जरा
> दिशाच सगळी बोलविली ”

यांसारख्या ओळींतील रम्य सूचकता उल्लेखनीय आहे. कार्व्हालोंच्या कवितेला अशा ठिकाणी आपोआपच आत्मविश्वास आलेला दिसतो, तो सार्थही असतो. ‘ तेव्हापासून ’, ‘ ओढ ’, ‘ बदल ’, ‘ आकडेमोड ’, ‘ माझी खोड ’, ‘ कळल्यावर ’, ‘ आगमन ’ या कविता अशा आत्मविश्वासाने लिहिलेल्या. आशय, अनुभूती आणि घाट यांचा समन्वय साधणाऱ्या कृत्रिमतेचा बुरखा फेकून देऊन निरागसतेचे दर्शन घडविणाऱ्या. कवीच्या व्यक्तित्वाचे ठसे अशा कवितांतून दिसतात. त्यांत उत्कट भावना आहे, नर्म विनोद आहे, मिस्किलपणा आहे, मुग्ध आणि तरीही धीट शृंगार आहे— काव्य आहे.

महाराष्ट्रविषयक कवितांचे आचार्य अत्र्यांनी कौतुक केले आहे. अशा कवितांत काही कल्पना चांगल्या आहेत. प्रभावी आहेत. पण या कविता एकसंध वाटत नाहीत. एखादी परिणामकारक कल्पना आणि मग प्रयत्नाने केलेली तिची एककेंद्रित आवर्तें अशा थाटाची त्यांची रचना वाटते. काही कवितांची तर अशी रचना मूळची परिणामकारकताही बाधित करते.

ज्येष्ठ कवींच्या प्रभावी कवित्वाची छाप पडणे हे साहजिक आणि अनिवार्यच. पण ‘ येणारच जर ’ यांसारख्या एखाद्या कवितेवर ही छाप इतकी स्पष्ट दिसते की अनुकरणाचा भास होतो. ‘ त्रिवेणी ’ या शीर्षकाखाली एक-दोन अगदी छोट्या कवितांतून चमत्कृती साधून कल्पनासौंदर्य व्यक्त केले आहे. पण—

> “ मला न उमजे आहे वा नच
> भाव दृष्टित तुझिया भोळा
> कारण नुमजे निश्चित कोठे
> तुवा रोखिला तिरळा डोळा

असली चमत्कृती बालिशच म्हणावी लागेल. जगातील अन्यायाविषयी कवीचा तडफडाट व्यक्त करणाऱ्या कविताही ढवळून निघाल्यासारख्या वाटत नाहीत. या तडफडाटात जोरच येत नाही. आवेश उतरत नाही. ख्रिस्ताला केलेले आवाहनसुद्धा त्यामुळे सपकच वाटते. कळकळीने भारून जात नाही. एक ‘ गाणे ’ म्हणून ते ठीक

आहे ' काव्य '- म्हणून नाही.

' खय्यामच्या सुरई 'सारख्या काही प्रतिमा कार्व्हालो यांना फार आवडतात असे दिसते. प्रथमदर्शनी त्या मोहक वाटतात. त्यांची पुनरुक्ती झाल्यावर त्यांतील सौंदर्य कमी होते. ' मुख-नयनाचे लास्य ' यांसारख्या प्रतिमा चुकीने आल्या की काय ते कळत नाही. दुसरे म्हणजे, एकदा कविता लिहिण्यासाठी वृत्तांचे बंधन स्वीकारले म्हणजे ते पाळणे आवश्यक ठरते. कित्येक ठिकाणी कार्व्हालो यांचे अवधान याबाबत सुटलेले दिसते. थोड्याशा परिष्करणाने हे क्षुल्लक दोष टाळता आले असते.

[ **' शांभवी '** – रॉक कार्व्हालो : जयहिंद प्रकाशन : मूल्य ३ रुपये : पृष्ठे १०३ ]

## काही रंजक गोष्टी

या संग्रहात नऊ गोष्टी आहेत. वाचनाची आवड असणाऱ्या लोकांचे रंजन होईल असे त्यांचे स्वरूप आहे. प्रत्येक गोष्टीत काही ना काही नाट्याचे बीज आहे. त्याची कलापूर्ण जडणघडण व जोपासना नाही, पण त्या नाट्याला भरपूर उठाव मिळेल अशा तऱ्हेने प्रसंगांची व घटनांची रचना केलेली आहे. त्यामुळे त्या सर्व गोष्टी घटनाप्रधान झालेल्या आहेत. ' हारजीत ' व ' व्यवहारेषु सखा ' या गोष्टींत विशिष्ट मनोवृत्तींच्या व्यक्ती केंद्रस्थानी आहेत; पण व्यक्तिदर्शनापेक्षा तदनुषंगिक घटनांच्या चित्रणातूनच नाट्य रंगविलेले आहे. निवेदनपद्धती साधी, म्हणूनच सुसह्य आहे. भावना, मनोविश्लेषण, साहित्यसेवा वगैरे आवाक्याबाहेरच्या गोष्टींचा बडेजाव न करता सलग सहजतेने कथन केल्यामुळे लेखन सर्वत्र नेटके झालेले आहे. सुंदर ड्रायव्हरशी लग्न करण्याचा निश्चय जाहीर करून आईच्या सौंदर्याचा तोरा उतरविणारी मुलगी, एकुलत्या एक मुलाच्या अपघाती निधनाने त्रागा करून नवऱ्याला खुनी समजणारी पत्नी, गुन्हे पकडून दाखवण्यासाठी ईर्ष्येने विनयभंगाच्या खास खात्यात दाखल होणारा, पण बावळटपणामुळे फजीत होणारा शिवराम हवालदार; प्रियकराच्या उत्कर्षासाठीच त्याला नकार देऊन जन्मभर त्याच्या आठवणीने अविवाहित राहणारी प्रेमिका; असे विविध विषय गोष्टींमध्ये हाताळल्याने प्रत्येक गोष्टीत विविधतेचे प्रत्यंतर येते. गोष्टींच्या रंजकतेचा हाही एक भाग आहे.

[ **' हारजीत '** – पंडित क्षीरसागर : ललित प्रकाशन :
मूल्य : तीन रुपये पन्नास पैसे : पृष्ठे ९६ ]

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ स्वर्गाच्या फ्लाइटवरची हवाई सुंदरी

तुकारामबाबा विमानात बसून सदेह वैकुंठाला गेल्याचे सिनेमात पाहिल्यापासून मलाही मनात अधून मधून असा विचार येतो की कुठल्या विमान कंपनीची फ्लाइट स्वर्गाला जाऊन येते याची चौकशी करावी. कारण देवाला प्रसन्न करून ज्याप्रमाणे स्वर्ग मिळविता येतो त्याप्रमाणे विमानात बसूनही स्वर्ग गाठता येतो असे दिसते. आता हेच बघाना, अमेरिकेतल्या एका ख्रिस्ती मठात दीक्षा घेऊन जोगीण बनू इच्छिणाऱ्या तरुण मुलींना हवाई सुंदरींप्रमाणे सौंदर्य प्रसाधनाचे धडे देतात, असे काल-परवा कोठतरी वाचले. म्हणजे हवाई सुंदरी काय किंवा ख्रिस्ताचे नाम जपणारी जोगीण काय, दोघींचे कार्य एकच व ते म्हणजे अमेरिकेच्या नाही, तर परलोकाच्या प्रवासाला निघालेल्या पॅसेंजर मंडळीच्या सुखसोयींकडे लक्ष पुरविणे. अर्थात माणसाच्या विमानातही हवाई सुंदरी नीटस असणे जसे आवश्यक आहे तसेच देवाच्या एअर-लाइनमधली जोगीण–कम्–होस्टेसदेखील आकर्षक असणे स्वर्गाच्या टूरिस्ट बिझिनेसच्या दृष्टीने आवश्यक आहे. माझी तर खात्री आहे की अमेरिकेतल्या तमाम जोगिणी बायबलमधल्या " दहा आज्ञां "च्या जोडीला मॅक्स फॅक्टरची अकरावी आज्ञा कसोशीने पाळू लागल्या तर सर्वसाधारण अमेरिकन माणसाला देवदर्शनाची उत्सुकता खूपच अधिक वाटू लागेल.

सौंदर्य-प्रसाधनाच्या जोडीला या हवाई जोगिणींना इतरही शिक्षण द्यायला हवे असे मला वाटते ! उदाहरणार्थ, परलोक पॅसेंजरांना विमान लागू नये म्हणून त्यांस 'मेड इन् हेवन' छापाच्या लिमलेटच्या गोळ्या वाटण्याचे काम त्यांना करावे लागेल. त्याचप्रमाणे कस्टमला चुकवून कोणी २० किलोपेक्षा जास्त पुण्याचे गाठोडे तर बरोबर घेत नाही ना याकडे लक्ष पुरवावे लागेल. आणि शेवटी प्रवासी पुण्यात्म्याला अक्षरश: "पोचवल्या "वर त्याला गोड शब्दांत शेवटचा निरोप देताना म्हटले पाहिजे : "गुड बाय ! 'क्षीणे पुण्येमर्त्य लोक विशंति' हे आपल्याला ठाऊक असेलच. तेव्हा परत जाताना आमच्याच विमानाने प्रवास करा...."

## □ रिकाम्या न्हाव्याला भिंतीच्या तुंबड्याची भेट

इंग्लंडातल्या एका गावात एका माणसाने नगरपालिकेच्या कबरस्तानाची रखवाली करण्याची नोकरी जन्मभर इमानेइतबारे केल्याबद्दल बक्षीस म्हणून नगरपालिकेने त्याला (त्याच्याच इच्छेवरून) त्या कबरस्तानात त्याच्या थडग्याला


पुरेल एवढी जागा मोफत दिली आहे. कल्पना ज़रा अघोरी वाटली तरी नावीन्यपूर्ण आहे यात शंका नाही. आणि ती अनेक व्यवसायातल्या मंडळींना उपयुक्त पडू शकेल. उदाहरणार्थ, परवा माझा सलूनवाला रिटायर होण्याच्या गोष्टी बोलत होता. अर्थात रिकाम्या न्हाव्याला योग्य भेट एकच– भिंतीला लावायच्या तुंबड्या! पलीकडच्या चाळीतले हेडक्लार्क तात्यासाहेबही पेन्शनीला आलेले दिसतात (तसे दिसू नये म्हणून "जवानीका वापसी टिकट" म्हणून जाहिरात करणारे कलप चोरून लावतात ही गोष्ट वेगळी). त्यांना एक जाडजूड फाईल द्यावी आणि उर्वरित आयुष्य सुखाने मार्जिनल नोटिंग करीत घालवा अशी शुभेच्छा प्रकट करावी. आणखी कोणाकोणाला काय काय देता येईल ? पोट सुटलेली नटी : लिमिकलचे संबंध पिप. पैसे खाऊन खाऊन अजीर्ण झालेला सरकारी अधिकारी : चौकशीचा जुलाब. लेखक : रद्दीवाल्याची गोण. जन्मभर प्रत्येक संपादकीयांत "आम्हांस" काय वाटते हे सांगणारा संपादक : व्याकरणाचे पुस्तक.

## □ मांजर आणि मृत्युपत्र

एकंदरीत कुत्र्याचे जिणे वाईटच. पण मांजराचे चांगले! कारण अमेरिकेत नुकतीच एक श्रीमंत बाई मेली. तिने आपली दोन लाख डॉलरची इस्टेट आपले एक मांजर व दोन पोपट यांना वाटून द्यावी असे मृत्युपत्र केले आहे. चैन झाली!– आता या श्रीमंत मांजराला उंदराच्या शिकारीची दगदग रोज करायला नको, की दुधाची बशी चाटण्याचे कष्ट करायला नकोत. आता ते आरामात मिशा साफ करीत बसेल आणि उंदीर मारण्याचे काम खास त्या नोकरीवर ठेवलेल्या अर्धा डझन मांजरांवर सोपवील. आता ते दूध पिणार नाही, मिल्कशेक घेईल. आणि पोपटपंचीत अर्थ नसतो असे आता कोणीच म्हणू शकणार नाही. कारण ती अर्थहीन असती तर या दोघा पोपटांना एवढा अर्थलाभ कसा झाला असता ? आता हे पोपट फक्त इम्पोर्टेड डाळिंबे खातील –आणि पिंजऱ्यांत झोका घ्यायच्या दांडीपर्यंत लिफ्ट लावून घेतील. ●

### नटीने पाळलेला नवरा

जेन मॅन्सफील्ड नावाच्या अमेरिकन नटीला तिचा नवरा रागाच्या भरात चावला या आरोपावरून तिने त्याच्यावर पंचवीस लाख रुपयांची फिर्याद केली आहे. मार डाला ! अनुरागांतले चुंबन आणि रागांतला चावा यांत पंचवीस लाख रुपयांचे अंतर आहे म्हणायचे. हाच चावा या नटीच्या कुत्र्याने घेतला असता तर तिला काय मिळाले असते ? फक्त इंजेक्शन. तेव्हा नटीचा नवरा हा प्राणी नटीच्या कुत्र्यापेक्षा तिला अधिक उपयुक्त आहे, हे सिद्ध झाले.



# तुमचे भविष्य आमचा अंदाज

**श्री. गो. जोशी,**
**सायनाचार्य, नासिक**

## दि. १३ ते १९ मे : राशिभविष्य

**मेष** : कर्तव्य आणि कर्तृत्व यांवरच तुमचा सारा भरंवसा. ग्रहांच्या इष्टानिष्टतेची दखल घ्यायला तुम्हांला वेळच नाही.

या वेळी तुमचे सारे कर्तृत्व उफाळून येईल. जिद्द–निर्धार पेटून उठेल आणि त्याचा परिणाम असा होईल की, तुमच्या अंगीकृत कार्यात कधी कुणाला मिळाले नसेल असे नेत्रदीपक यश मिळेल. अविश्रांत परिश्रम करणे हा तुमचा स्थायीभावच ! कर्तव्याला परिश्रमाचा गुणाकार केल्यानेच तुमच्या प्रगतीचे गणित झटपट सुटेल अशी तुमची श्रद्धा आहे. आणि याचा प्रत्यय आगामी ८-१० दिवसांतच यावा.

स्थानांतर घडेल, मंगलकार्य ठरेल, धनिकांचे कोणत्याही क्षणी सहकार्य लाभेल.

दि. १३–१८–१९ या कालाची नोंद करा.

**वृषभ** : तुमच्या राशीतील बुध–सूर्याची उपस्थिती तुमच्या मरगळलेल्या मनात चैतन्याचे स्फुलिंग पेटवील. आणि त्यामुळे अपयश, अपेक्षाभंग, नैराश्य यांची सारी जळमटे नामशेष होतील. आगामी सूर्य–गुरू लाभयोगाकडे (२१मे) तुमचे जीवन वाटचाल करू लागले आहे. त्या योगाच्या अचाट सामर्थ्याचा साक्षात्कार या आठवड्यापासूनच व्हायला लागेल.

नव्या योजना—नव्या कल्पना आकार घेऊ लागतील. नोकरीधंद्यातील सारे प्रश्न भराभर सुटायला लागतील. व्यवहारधंद्यासाठी मोठा पैसा उभा करणे हे आता फार अवघड नाही याची खात्री वाटू लागेल. या आठवड्यापासून सांसारिक जीवन प्रसन्नतेने दरवळू लागेल.

दि. १५–१८–१९ या काली अनेक संस्मरणीय चांगल्या गोष्टी घडाव्यात.

**मिथुन** : धनस्थानातील गुरूचे सामर्थ्य पाठीशी उभे आहे आणि शुक्राची कृपा-दृष्टी तुमच्याकडे वळलेली आहे. अशा वेळी अन्य कोणत्याही ग्रहाची बाधा होण्याची यत्किंचितही धास्ती बाळगू नका. अनुकूल ग्रहांच्या धुंद वातावरणात बेबंद कर्तृत्वाचा साक्षात्कार घडू लागेल.

पैसा हे या कालाचे मूल्यमापन नव्हे. यश–प्रतिष्ठा–लौकिक देणे हाच त्यांचा प्रमुख हेतू आहे. त्या दृष्टीने या कालाचा उपयोग करून घ्या.

गेल्या ८–१५ दिवसांत बऱ्याचशा तुमच्या अपेक्षा सफल झालेल्याच असतील. उरल्या सुरल्या या कालांत सफल कराव्यात हाच ग्रहयोगांचा हेतू दिसतोय. नोकरीधंद्यात अनपेक्षितपणे फार मोठी प्रगती व्हावी.

दि. १७ ते १९ या कालावर सारे लक्ष केंद्रित करा.

**कर्क** : पहिला गुरू—तिसरा मंगळ आणि सूर्य–बुध एकादशात इतकी सर्वांगीण विकासाची ग्रहस्थिती कित्येक वर्षांत आपण अनुभवलेली नसेल. आणि म्हणूनच काही लोकविलक्षण, अनन्यसाधारण असे कार्य करून दाखवाल.

या वेळी समाजातील अत्युत्तम स्थान आपणांस लाभेल, राजकीय वातावरणात तुमच्या उपस्थितीची नितांत गरज भासू लागेल, नोकरीधंद्यांत तर विक्रमी यश मिळवून दाखवाल.

दि. २१ आपल्या उज्ज्वल यशाचा केंद्रबिंदू. चांगल्या व चिरंतन स्मृतीच्या अनंत घटना त्या कालाच्या आसपास घडून याव्यात.

दूरचा प्रवास घडेल. कदाचित परदेशीय प्रवासाचीही लक्षणे दिसू लागतील.

दि. १८–१९ या कालापासून अनंत चांगल्या घटना घडून याव्यात.

**सिंह** : आगामी सूर्य–गुरू लाभयोग ही ग्रहस्थिती तुमच्या आजवरच्या यशावर सुवर्णकळस चढवील.

आपण हाती घेतलेल्या अनेक योजना गतिमान बनतील, राजकीय क्षेत्रात तर तुमच्याविना पान हलेनासे होईल. या कालापासूनच तुमच्या कर्तृत्वाला धार चढेल. भाग्याला उधाण यायला लागेल. तुमच्या आजवरच्या नैष्ठिक आचारधर्माचे श्रेय याच कालापासून मिळायला लागेल.

या वेळी आपल्या कार्यक्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडेल, आपण अनेक प्रगतीचे टप्पे ओलांडून पुढे जाल. शैक्षणिक यश अपेक्षेबाहेर लाभेल. साहित्य–कलाक्षेत्रात विक्रम करून दाखवाल.

दि. १३–१५–१८–१९ या कालांत अनेक प्रगत घटना घडाव्यात.

**कन्या :** वक्री मंगळाची डोकेदुखी भाग्यस्थ सूर्य बरीचशी कमी करील, शिवाय अकरावा गुरू तुमच्या पाठीशी सतत खडा आहेच.

हा आठवडा बराच स्वास्थ्याचा, प्रगतीचा ठरावा. अनेक विवंचना मिटाव्यात, हरवलेले स्वास्थ्य गवसावे. एवढेच नव्हे तर प्रयत्नांची शिकस्त केल्याचे सारे श्रेय पुरेपूर पदरी पडावे. आगामी कालाच्या अनुकूलतेची रूपरेषा आजच सांगून टाकतो की, दि. २१ मेच्या सूर्य–गुरू लाभयोगापासून ते ७ जनच्या सूर्य–मंगळ त्रिकोणाच्या कालमर्यादेत तुमचे सारे प्रयत्न अपेक्षेबाहेर यश घेऊन उठतील. अंतरिक्षातील ग्रहांच्या सामर्थ्याची प्रचीती घ्यायची असेल तर या कालखंडातच घ्या. अंतरिक्षातील ग्रहांचा मानवी यशापयशाशी काही संबंध नाही असे म्हणणाऱ्यांना हे उत्तर आहे.

दि. १५ ते १८ येथूनच अनुकूल कालाची लक्षणे दिसू लागतील.

**तूळ :** अजून काही दिवस तरी अंतरिक्षातील ग्रहांची आपणांस साथ मिळेल, अशी अपेक्षा करू नका. पण अशा वेळीच तुमच्यातील जिद्दीला जाग येते, निर्धार पेटून उठतो. आणि त्यामुळेच थोडेफार तरी यश आपण मिळवल्याशिवाय राहणार नाही. काही दिवस असे झगडत, धडपडत आपणांस वाटचाल करावीच लागणार आहे. असे असूनही अपयश, अपेक्षाभंग असे काही होणार नाही. खर्चाचे मान आटोक्याबाहेर जाईल, मानसिक ताण खूपच वाढेल, यापेक्षा अधिक काही होणार नाही.

या महिन्यात शक्यतो अधिक खर्चाची प्रकरणे काढू नका आणि प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका.

दि. १३–१४–१७–१८ या काळात अनेक महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागतील.

**वृश्चिक :** या वेळी गुरू–मंगळ–सूर्य आदी अंतरिक्षातील अनेक ग्रह तुमच्यावर खूष दिसतात. त्यांच्या सहानुभूतीने आणि सहकार्याने आपण अनेक क्षेत्रांत विक्रम गाजवू शकाल. आता प्रकृतीची विवंचना नाही की, पैशाची चणचण नाही. सारे काही अपक्षेप्रमाणे घडून यायला लागेल. या वेळी तुमच्या अंगच्या अद्‌भुत सामर्थ्याचे दर्शन घडेल. राजकीय वर्तुळात तुमच्या नावाचा दबदबा वाढेल. व्यावहारिक क्षेत्रात यशस्वी म्हणून तुमचा गौरव होऊ लागेल. सर्व कामे गती घेऊ लागतील. इष्टमित्र दिलखुलासपणे सहकार्य करतील.

दि. १५ ते १९ या काळी अनेक अपेक्षासाफल्याच्या घटना घडतील.

**धनू :** सध्याचे ग्रहमान तसे ठीक. पण उत्तम नाही म्हणून आपण काहीसे नाराज दिसता. महत्त्वाकांक्षी व्यक्तींना लहानसे यश खुपत असते. काहीतरी भव्य

दिव्य घडवून आणावे हीच त्यांच्या मनाची धारणा. तसे घडेलही पण त्यासाठी काही काळ वाट पाहावी लागेल.

व्यापारी क्षेत्रांत आंदोलने उठू लागतील, काही प्रकरणी वडीलधाऱ्या मंडळींची नाराजी पत्करावी लागेल, थोडेसे मिळते जुळते घ्यावयाचे ठरविलेत तर हे सारे प्रसंग निभावून नेऊ शकाल. हे दिवस दूरच्या प्रवासाला ठीक नाहीत.

दि. १७ ते १९ प्रयत्न यशस्वी ठरतील.

**मकर** : या वेळचे ग्रहमान आपणांस हवे तसे आहे यामुळेच या काळी आपणांस हवे ते मिळेल. दूरचा प्रवास घडेल, मंगलकार्यात हिरीरीने भाग घ्याल. थोरांचे सहकार्य मिळवून उत्तुंग यश पदरी पाडून घ्याल. सभासंमेलनात प्रतिष्ठेचे स्थान मिळवाल.

या वेळी आपणांस कामाचे डोंगर उपसावे लागतील, क्षणाची उसंत मिळणार नाही आणि या साऱ्या परिश्रमांचे यशही अपेक्षेबाहेर पदरी पडेल.

व्यवसाय-धंद्याचे एक नवे आणि यशस्वी तंत्र-मंत्र जगाला शिकवाल. अनपेक्षितपणे फार मोठे लाभ उठवाल. परदेशी प्रवासाचेही काही जणांना भाग्य लाभेल.

दि. १७ ते १९ या कालापासून अनेक कामे गती घेऊ लागतील.

**कुंभ** : मंगळ आठवा आणि सूर्यही चौथा. शिवाय गुरू-शनी बरेच दिवसांपासून तुमच्यावर नाराजच आहेत. पण म्हणून काही हा काल अपेक्षाभंगाचा आहे असे मानायचे कारण नाही. खर्च वाढेल, घरी पाहुण्यांची वर्दळ वाढेल, मंगल कार्यासाठी अमाप खर्च करणे भाग पडेल. पण सामाजिक प्रतिष्ठेला बाध येणार नाही की, व्यावसायिक परिस्थिती बिघडण्याची भीती नाही.

लवकरच आपणांस अपेक्षेप्रमाणे अनुकूल वातावरण दिसू लागेल. सद्य:स्थितीबद्दल नाराज बनू नका.

दि. १३ ते १६ काही अपेक्षा सफल व्हाव्यात.

**मीन** : सप्तमस्थानातून मंगळाचे उच्चाटन झाल्याशिवाय हरवलेले स्वास्थ्य गवसण्याची शक्यता फारच कमी. तोपर्यंत संयम-शांततेची पथ्ये पाळणे आवश्यक आहे.

याकाली व्यापारधंद्याची घसरण तीव्रतेने जाणवेल. राजकीय व सामाजिक क्षेत्रात विरोध तीव्र स्वरूप धारण करील, बुडलेला धंदा उभारण्यासाठी व भंगलेल्या अपेक्षा सांधण्यासाठी रान उठवावे लागेल. सहजसुलभ यश पदरी पडण्याची सध्यातरी शक्यता दिसत नाही. पैसा पाण्यासारखा खर्च होऊनही मनासारखे काहीच घडणार नाही. या काळी स्वतःच्या व कुटुंबियांच्याही प्रकृतीची काळजी घ्या.

दि. १३ ते १६ काहीसे अनुकूल दिवस.

●

## □ विसावं वरीस लग्नाचं !

लग्न ! कुणी संस्कार मानतात तर कुणी करार ! नाही पटलं तर घेतली काडी मोड ! पाश्चात्त्य देशांत तर विवाहप्रसंगी गळ्यात घालण्यात येणाऱ्या पुष्पमालांतील फुले कोमेजण्यापूर्वीच पतिपत्नीतील तथाकथित प्रेम आटते आणि जन्माची गाठ सुटते, असं म्हणतात ! यातली अतिशयोक्ती सोडली तरी तिकडील घटस्फोटांची वाढती संख्या लग्नसंस्थेच्या तकलुपीपणाचीच ग्वाही देत आहे. तिकडच्या सिनेमा नटचा तर चेहऱ्यावरील हावभावाइतकेच पतिदेवही झटपट बदलतात म्हणे ! त्या दृष्टीने आमच्याकडील सिनेनटचा अजून तरी भारतीय संस्कृतीची चाड बाळगून आहेत हं !

तसा हल्ली सिनेमानटींचा लग्न संस्थेवरील विश्वास भलताच वाढल्यासारखा दिसतो ! गेल्या सहा महिन्यांत बऱ्याच सिनेनटचांची लग्ने लागली ! अगदी नावनिशीवारच माहिती हवी असेल तर कोणाही विद्यार्थ्याला विचारा ! तो क्षणार्धात तुम्हांला इत्थंभूत माहिती पुरवील !

परंतु सर्वसामान्य तरुणींची लग्ने ही फार जिकिरीची बाब ! कारण प्रत्येक तरुणाला 'सायराबानो' ( स्वतःला तो दिलीपकुमारच समजत असतो मुळी ! ) हवी असते ! शिवाय 'वडील माणसांना दुखविता येत नाही' म्हणून हुंडाही (मागल्या दारानं का होईना ! ) हवा असतोच ! परिणामः शाळा कॉलेजेस्–ऑफिसेस–कारखाने–सर्वत्र तरुणांना मिळत नाहीत नोकऱ्या, आणि त्या जागा अडवून बसलेल्या पुरंध्रींना नवरे ! असं हे दुष्ट चक्र अव्याहतपणं चालू आहे.

त्या मानानं पूर्वीच्या काळी बरं होतं ! पाळण्यातच लग्नं लागत ! त्यामुळं या सर्व भानगडींना मुळी 'स्कोपच' राहत नसे ! उलट, आता 'भानगडीशिवाय' लग्नालाच स्कोप राहिलेला नाही ! असो. कालाय् तस्मै नमः !

पण काही म्हणा ! कै. देवलांच्या 'शारदा'नं या बाबतीत कायद्याचा बडगा मानगुटीवर बसवल्यापासून लग्नासारख्या सर्वस्वी खासगी बाबतीत सरकार भलतेच हस्तक्षेप करू लागले आहे.

आता हेच पाहा नं ! देशाच्या वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी सरकारने लग्नाची वयोमर्यादा आता वीस केली आहे, असे आरोग्यमंत्र्यांनी नुकतेच घोषित केले ! आता बोला ! 'आग सोमेश्वरी आणि बंब रामेश्वरी' असाच नाही का हा प्रकार !

हा शुद्ध अन्याय आहे ! म्हणजे असं पाहा, ज्याचं पोट तुडुंब भरलं आहे, त्याला ताटावरून उठवायचं सोडून उपाशी माणसाच्या घशात जेवणाऐवजी संयम पाळ-

ण्याचे उपदेशामृत ओतण्यात काय अर्थ आहे !

हे जुने जाणते लोक एकाच वेळी जुळी–तिळी, क्वचित 'पंचप्राणांनाही' जन्म देतात ! तेव्हा आधी त्यांचा बंदोबस्त करा, मग लग्नाची वयोमर्यादा वाढवा, असं ठासून बजावायला लोहिया प्रभृति पुढे सरसावतील काय ? **"उर्दू अखबार"** (पुणे)

## □ पाकच्या परस्परभिन्न प्रतिक्रिया

भारतातील सार्वत्रिक निवडणुकांतील काँग्रेस व विरोधी पक्षांच्या यशापयशासंबंधी पाकिस्तानात जे परस्परविरुद्ध पडसाद उमटले ते मोठे मनोरंजक आहेत–

'जंग' या पत्राने काँग्रेसच्या घोर अपयशाची कारणमीमांसा करताना म्हटले,

"हिंदू जातीयवाद्यांचा जोर वाढल्यामुळे काँग्रेसला अनेक राज्यांत पराभव पत्करावा लागला. आता भारतातील मुस्लिमांना ह्या जात्यंध प्रतिगामी शक्तींपासून फारच धोका निर्माण झालेला आहे ! लोकशाहीचा दंभ अशा प्रकारे उघडा पडल्यामुळे भारताच्या सार्वभौमत्वालाही धोका उत्पन्न झाला आहे. तेव्हा पाकिस्तानी नागरिकांनी यापासून वेळीच धडा घ्यायला हवा. लोकशाही हे एक मृगजळ आहे ! त्याच्या मागं धावायला आम्ही भारतीय नेत्यांसारख्या दुधखुळ्या व भोळ्या 'हरिणी' नाहीत तर शक्तिमान व बुद्धिमान 'वनराज' आहोत !"

ही रेकॉर्ड निरनिराळ्या सुरांत 'अंजाम' (कराची), 'पासबान' (डाक्का) इत्यादी प्रे. अयूबच्या समर्थक वृत्तपत्रांनी लावली होती व शेवटी "लोकशाहीसारखी चैन वा चोजले भारत किंवा पाकसारख्या मागासलेल्या व गरीब देशांना परवडण्यासारखे नाहीत," असा निष्कर्षही काढलेला होता !

या उलट, लाहोरच्या 'नवाए–वक्त' या अयूबविरोधी पत्राने काँग्रेसचे रथी-महारथी–कामराज, एस्. के. पाटील, सचिंद्र चौधरी, सुब्रह्मण्यम–इत्यादींच्या पराभवाच्या विश्लेषणास्तव एक–दोन संपादकीय खर्ची घातले होते–

"चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतातील काँग्रेसला घोर अपयश आलेले पाहून व त्यामुळे भारतातील लोकशाहीस तडा जाऊ पाहत असल्याचे जाणून अनेक पाक नागरिकांना आनंदाच्या उकळ्या फुटत आहेत, परंतु हे लोक भारताच्या बरबादीचे जे भेदक व भयानक चित्र रेखाटीत आहेत, ते कितपत वस्तुस्थितिनिदर्शक आहे, हे काळच ठरवील !

तूर्त, काँग्रेसला जो पराकोटीचा पराभव पत्करावा लागला आहे, त्यावरून भारतात लोकशाहीस धोका उत्पन्न झाला आहे, असं म्हणण्याची घाई करणे अदूरदर्शीपणाचे ठरेल !"

अशा प्रकारे भुट्टोआदी अयूबचे विरोधक भारतीय निवडणुकातील यशापयशाचे मांडवल करून पाकमध्ये वातावरण तापवीत आहेत. परंतु अयूबही त्यांचा खंबीरपणे बीमोड करीत आहे. नुकतेच त्याने या संदर्भात मौलाना मौदुदी यांना स्थानबद्ध केले आहे. **'परचम-इ-हिंद'** (दिल्ली)

# आक्षेपार्ह नाट्याविष्कार !

पडदा वर जातो. रंगभूमीवरील अंधुक प्रकाशात प्रेक्षक काहीतरी शोधू लागतात तोच जराजर्जर शरीरातून निघालेले दर्दनाक चीत्कार...कर्णकर्कश कोलाहल, करुण पण अस्फुट किंकाळ्या कानांवर पडतात ! असं बराच वेळ चालतं. मग हळूहळू रंगमंच प्रकाशानं उजळू लागतो. आणि त्यात दृश्यमान होते एक मूर्ती...मग दुसरी...

प्रेक्षकांच्या आश्चर्याला पारावारच राहत नाही; कारण त्या मूर्ती दुसऱ्या-तिसऱ्या कोणाच्या नसून ' इंदिरा गांधी ' आणि ' कामराज ' यांच्या असतात !

" अन्न-अन्न " असा एकच आरडाओरडा वातावरणात घुमतो. नाट्यमंदिर दुमदुमवून सोडतो.

काही वेळाने हाही कोलाहल कमी कमी होत जातो आणि ' कामराज 'चा आवाज प्रेक्षकांच्या कानी पडतो...

कामराज : प्रिये इंदिरे, तू ' आइसोमेट्रिक ' या नवीन शास्त्रासंबंधी काही ऐकलंय् का ?

इंदिरा : आइसोमेट्रिक ?

कामराज : हो ! आइसोमेट्रिक ! गोठवलेला मृत्यू !

इंदिरा : ओह् ! भयंकर थंड !

कामराज : परंतु फार सोपं. अगदी साधी ' प्रोसेस '—लोकांना बर्फाचे इंजेक्शन देण्यात येते ! आणि गोठवून ताठ करण्यात येते ! शिवाय पुनश्च जिवंतही करता येते ! !

इंदिरा : पुढे ?

कामराज : परंतु ' नवजगतात ' ह्याला हिंसा मानण्यात आलं आहे !

इंदिरा : नवजगत् ?

कामराज : होय, नवजगत्. कोलंबसाने शोधून काढलेला भारत तुला माहीत नाही ?

इंदिरा : त्याबद्दल मी कधी ऐकलेच नाही !

कामराज : माहीत असायला हवं ! ते इंग्लंडचं दुसरं सत्य आहे !

इंदिरा : (भीतीने) कृपया त्याची आठवण काढू नका !

कामराज : तू अशी थरथरतेयस् का ?

इंदिरा : मी थरथरत नाही, कापत आहे !

कामराज : पण, तू कापतेयस् तरी का ?

इंदिरा : गोठवलेल्या मृत्युसाठी !

कामराज : छे: ! त्यात भिण्यासारखे काहीच नाही. आपण भारताची अर्धी लोकसंख्या गोठवू या ! म्हणजे मग त्यांची जबाबदारी २१ व्या शतकावर पडेल–त्यालाच त्यांची चिंता वाहावी लागेल !

इंदिरा : पण–पण...गोठवायचं कोणाला ?

कामराज : कोणाला ? इंदिरे, तू आपला इंग्रजी धडा आठव. ऊठ आणि तुझे 'आइसोमेट्रिक' नृत्य सुरू कर ! नाचताना तू ज्याच्याकडे अंगुलिनिर्देश करशील, तो गोठून जाईल !

इंदिरा : तुमच्या व्याकरणाशी मी सहमत असले तरी कल्पनेशी नाही ! खरोखर मुळीच नाही ! यापुढे मी भात खाणार नाही ! 'आइसोमेट्रिक' नाच करीन ! रोसा, (आचारी) माझ्यासाठी भात करू नकोस ! त्याऐवजी मी खेकडयाचे पाय आणि बटाटे घेईन !

—हीं एक धावती झलक आहे, न्यूयॉर्कमध्ये स्वत:स विनोदी कलामंडळ (The Play House of the Ridiculous) म्हणवून घेणाऱ्या कलाकारांतर्फे सादर करण्यात आलेल्या 'इंदिरा गांधींची धाडसी योजना' (Indira Gandhi's Daring Device) या भारत–द्वेषी अश्लील नाटकाची !

प्रस्तुत नाटचप्रयोग पाहिलेल्या न्यूयॉर्क येथील भारतीय विद्यार्थ्यांनी आपल्या वकिलातीत याबाबत तक्रार नोंदविली होती व तसेच ज्या विद्यापीठापुढे हा नाटच-प्रयोग सादर करण्यात आला होता, त्यांच्याकडेही आपला निषेध नोंदविला होता. त्याबाबत खुलासा करताना रोनाल्ड टॅव्हेलने म्हटले, "इंदिरा गांधी पंतप्रधान म्हणून निवडून आल्याचे वृत्त मी 'न्यूयॉर्क टाईम्स'मध्ये वाचले व त्यावरून माझ्या नाटकात इंदिरा गांधी व कामराज ही पात्रे मी घेतली ! कारण दिल्लीतून आलेल्या बातमीत नवीन राज्ययंत्रणेत कामराजांचेच अधिक वर्चस्व राहील, यावर भर देण्यात आला होता !"

शेवटी टॅव्हेलने असंही म्हटलं की, "एका रात्रीत लिहिलेल्या या नाटुकल्यामध्ये तसे काहीच तथ्य नाही !"

परंतु टॅव्हेलच्या या परस्परविरुद्ध विधानांमुळे वा स्पष्टीकरणामुळे मूळ कृतीतील कुरूपता किंवा क्रूरता कमी होणार आहे थोडीच ? नाटचाविष्कारासाठी त्यांनी भारतातील दैन्य व विपत्तींचे मांडवल करावे, किंबहुना भारताच्या अंतर्गत राज-कारणात ढवळाढवळ करावी, हे अमेरिकन सरकारला आक्षेपार्ह वाटू नये ?

भारत–पाक युद्धाच्या वेळी घडलेल्या पक्षपाताने अमेरिकेच्या सद्हेतूंविषयी भारतीयांची मने आधीच साशंक असताना उपरोक्त अनुचित प्रकारांनी ती अधिकच कलुषित होण्याचा संभव नाही काय ? मग अमेरिकन सरकार अजून स्वस्थ कसे ?

**हिदायतखान**

## द्री सिंगिंग नन्

# डेब्बी रेनॉल्डस्

खिस्ती कॉन्व्हेन्टमधील जोगिणी म्हणजे विरक्ती पत्करलेल्या स्त्रिया त्या अत्यंत गंभीर असतात. हसणे, गाणे, आनंदाने राहणे त्यांना माहीतच नसते, अशा प्रकारचा समज प्रचलित आहे! परंतु 'दी सिंगिंग नन्' या चित्रपटात गिटार घेऊन आनंदाने गाणाऱ्या एका जोगिणीची कहाणी विनोदाची पेरणी करून मोठ्या कल्पकतेने व हळुवारपणे चित्रीत केली आहे. आणि या चित्रपटाच्या यशात 'सिंगिंग नन्' बनलेल्या डेब्बी रेनॉल्डस्‌चा मोठा वाटा आहे.

मेट्रो–गोल्डविन–मेयर या चित्रपट संस्थेतर्फे बेल्गियन नन्‌च्या जीवनावर संगीत आणि विनोदप्रधान चित्रपट काढण्यात येणार आहे, असे जेव्हा डेब्बीला समजले, तेव्हा तिने चटकन् निर्मात्यांना फोन करून आपण त्या बेल्गियन नन्‌ची भूमिका करणार असल्याचे सांगितले. त्यांनीही लगेच तिच्या म्हणण्याला होकार दिला. कथा ऐकल्यावर तिने आपल्या एका कॅथॉलिकपंथीय मैत्रिणीद्वारा उत्तर कॅलिफोर्नियामधील एका कॉन्व्हेन्टमध्ये प्रवेश मिळविला. तिथे राहून तिने तेथील वातावरणाचे निरीक्षण केले. तेथील सिस्टर्स अत्यंत दयाळू असल्याचे तिला आढळून आले. त्याचप्रमाणे तरुण नन्स अत्यंत खेळकर व विनोदी असल्याचा तिला अनुभव आला. तेथील अल्पकाळच्या वास्तव्याचा तिला 'दी सिंगिंग नन्'मधील 'सिस्टर ॲन' साकार करताना फारच उपयोग झाला. आपल्या अभिनयात अधिक वास्तवता यावी म्हणून सोळा आठवडे डेब्बी गिटार वाजवायला शिकत होती.

डेब्बी रेनॉल्डस्‌चा जन्म एक एप्रिल रोजी झाला. तिचे खरे नाव मेरी फ्रान्सिस असे आहे. तिच्या आजोबांचाही जन्म एक एप्रिल या दिवशीच झाला असल्यामुळे तिचे त्यांच्याशी चांगलेच पटत असे. त्यांचा देवावर आणि बायबलवर फारच विश्वास होता. बायबलमधील कित्येक वचने ते तोंडपाठ म्हणून दाखवीत व वेळोवेळी त्यांचे दाखलेही देत असत. तेव्हा धार्मिक वातावरणात डेब्बीचे बालपण गेले.

पुढे एका वार्षिक सौंदर्यस्पर्धेत 'मिस् बरबँक' म्हणून डेब्बी निवडली गेली तिला हॉलिवूडचे निमंत्रणही मिळाले. परंतु या घटनेने तिच्या घरात वादळ उठले. कारण चित्रपटात काम करणे हे तिच्या चर्चच्या दृष्टीने पाप नसले तरी ती भयंकर गोष्ट समजली जात असे. लोकांनीही हॉलिवूडबद्दल तिच्या मनात नाही नाही ते

भरवून दिले. डेब्बीला कशावर विश्वास ठेवावा हे समजेना. ती अगदी निराश होऊन गेली. शेवटी तिचे आजोबाच तिच्या मदतीला धावून आले. त्यांनी डेब्बीच्या हॉलिवूड–प्रयाणाला काहीही हरकत नसल्याचा निर्वाळा दिला. डेब्बीचा उत्साह दुपटीने वाढला व तिने हॉलिवूडला जाण्याची तयारी सुरू केली.

हॉलिवूडमध्ये वॉर्नर ब्रदर्सशी डेब्बीचा करार झाला होता. तिथे सुमारे एक वर्षभर तिला एक्स्ट्रॉ भूमिका कराव्या लागल्या. ह्या उमेदवारीनंतर तिला 'दी डॉक्टर ऑफ रोझी ओ ग्रेडी' नावाच्या चित्रपटात प्रमुख भूमिका करण्याची संधी मिळाली. तिची ही पहिलीच मोठ्या स्वरूपाची भूमिका विनोदी होती.

जेव्हा सदर चित्रपट बरबँक येथे प्रदर्शित झाला, तेव्हा डेब्बीचे आजोबा हर्मन हे हृदयविकाराने आजारी असूनही तिचा चित्रपट पाहण्यास गेले. त्यातील विनोदांनी त्यांना खूपच हसविले. घरी आल्यावरही त्यांचे हसणे काही कमी होईना. शेवटी त्यातच त्यांचा अंत झाला. मृत्युपूर्वी त्यांनी डेब्बीबद्दल प्रशंसोद्‌गार काढले.

हॉलिवूडच्या धुंद वातावरणात डेब्बी चांगलीच रमली. विनोदी भूमिका करण्याकरिता तिला बरीच मागणी येऊ लागली. ट्वेन्टीएथ सेंच्युरी फॉक्स्‌चा 'सेव्हन फॉर मी', मेट्रोचा "इट स्टार्टेड विथ दी किस', पॅरामाऊंटचा 'रॅन्टरेस' हे तिचे अलीकडील गाजलेले चित्रपट. त्याशिवाय एम्. जी. एम्. च्या 'मॅटिंग गेम'–मधील तिच्या भूमिकेचीही सर्वत्र प्रशंसा करण्यात आली होती.

चित्रपटात विनोदी भूमिका करणाऱ्या डेब्बीला खाजगी आयुष्यात मात्र स्वस्थता लाभली नाही. एडी फिशरशी तिचा विवाह झाला. त्यांना दोन मुलेही झाली. परंतु एडी फिशर एलिझाबेथ टेलरच्या प्रेमात पडला, हे जेव्हा तिने पाहिले तेव्हा तिने घटस्फोटासाठी अर्ज दिला. घटस्फोट मिळाल्यानंतर काही तासांतच एडीने एलिझाबेथशी विवाह केला. पुढे त्याचीही परिणती घटस्फोटातच झाली. एडीशी घटस्फोट घेतल्यानंतर डेबीने हॅरी कार्ल या प्रौढ कोटयधीश व्यापाऱ्याशी विवाह केला.

हास्यप्रधान चित्रपटात भूमिका करणे ही डेब्बीची आवड. त्याशिवाय तिची दुसरी एक आवड मोठी मजेशीर आहे व ती म्हणजे दर दीड-दोन वर्षांनी तिला आपले राहते घर बदलायला आवडते. आपणांस न सोडावेसे वाटणारे घर सापडेपर्यंत आपण अशीच घरे बदलत राहणार, असे ती म्हणते. हॉलिवूडच्या अभिनेत्री नेहमी पती बदलण्याच्या उद्योगात रममाण झालेल्या असतात तर डेब्बी घरे बदलण्यात गुंतलेली असते.

'दी सिंगिंग नन'नंतर डेब्बी मेट्रो-गोल्डविन-मेयरच्या 'दी अनसिंकेबल मॉली ब्राऊन' या चित्रपटात दिसेल. या चित्रपटातील भूमिकेकरिता तिला ऑस्कर नॉमिनेशन मिळाले आहे. सदर चित्रपट लवकरच भारतात प्रदर्शित होईल.

**– अशोक प्रभाकर आंग्रे**

## राणी लक्ष्मी मंडळ — एका तपाची वाटचाल

राणी लक्ष्मी मंडळ या सरकारमान्य संस्थेला १० मे १९६७ ला बारा वर्षे पूर्ण होत आहेत. संस्थेचे ध्येय मानवतेची नीतिमूल्ये जतन करणे, सद्गुणांचा गौरव करणे आणि राजकारणापासून अलिप्त राहून समाजसेवा करणे हे आहे. संस्थेच्या संकल्पित आठ विभागांपैकी क्रीडा, शिक्षण, उत्सव, श्रद्धा, हे विभाग उत्तम रीतीने चालू आहेत. ज्ञानसाधना या स्वरूपात दर बुधवारी बैठक घेतली जाते. नामवंत वक्त्यांची भाषणे आयोजित केली जातात. १९५८ ला राणी लक्ष्मी मंडळाने संग्राम देवता लक्ष्मीबाई झाशी यांच्या १०० व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने महाराणी लक्ष्मी स्मारक मंदिर निर्माण केले आहे.

लक्ष्मी बालक मंदिर व सोमण प्राथमिक शाळा ही संस्थेची शैक्षणिक कामे चालू आहेत. त्या विभागाची यंत्रणा स्वतंत्र असून विश्वस्त मंडळ त्यांना सहकार्य व प्रोत्साहन देत असते.

थेऊर येथे एक अतिथी गृह चालू आहे आणि ग्रामस्थ व सरकार यांच्या सहकार्याने आरोग्यधाम (सॅनिटोरियम), विश्रांती-गृह जमल्यास वृद्धाश्रम वगैरे अल्पमूल्य घेऊन तेथे चालवावे असा श्रद्धाकेंद्राचा विचार आहे. प्रतिवर्षी स्वर्गीय सती यमुनाबाई सावरकर यांची पुण्यतिथी होत असते. समाजसेवा करणाऱ्या नामवंत भगिनींना त्यानिमत्त सौभाग्यवाण दिले जाते. मंडळाचे पाच प्रमुख उत्सव असतात. १० मे, १८ जून, नागपंचमी (देशी खेळ), कोजागिरी, शिवजयंती, १० मे हा स्थापन दिन व १८ जून संग्रामदेवता लक्ष्मीबाई झाशी यांची पुण्यतिथी.

संस्थेला बारा वर्षे पूर्ण झाली असल्याने अनेकांचे सहकार्य घेऊन चालू साली संस्थेची स्मरणिका (सोव्हिनूर) काढावयाचे विश्वस्त मंडळाने ठरविले आहे. जनतेच्या सहकार्याने केलेली तपस्या आज जनताजनार्दनासमोर ठेवताना व पुढील वाटचालीसाठी सहकार्य मागताना विश्वस्त मंडळाला अंशत: समाधान वाटते आहे. व्यापारी, कारखानदारबंधूंनी या स्मरणिकेला आपल्या जाहिराती देऊन संस्थेला उपकृत करावे, अशी विश्वस्त मंडळाची विनंती आहे. स्मरणिका (सोव्हिनूर) १८ जून १९६७ ला संग्रामदेवता झाशी यांच्या पुण्यतिथीचे दिवशी प्रकाशित करण्याचा संकल्प विश्वस्त मंडळाने केला आहे.

सौ. शांताबाई गोखले
संयोजक, राणी लक्ष्मी मंडळ,
३४१ सदाशिव पेठ, पुणे २.

# राजा शिवछत्रपति

**१००** रुपयांची ठेव

**६** वर्षांसाठी

- 'राजहंस प्रकाशन संस्थे' कडे ठेवल्यास सुमारे सात टक्के व्याजाच्या मोबदल्यात हा ग्रंथ प्रसिद्धीनंतर तावडतोब विना-म[ू]ल्य घरपोच मिळेल.

- ठेवीची रक्कम 'राजहंस प्रकाशन' या नावे ड्राफ्टने वा म. ऑ.ने पाठवावी. सोबत नाव, पत्ता संपूर्ण असावा.

- चेक असल्यास तो पुणे-मुंबई बँकेवरचा असावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा चेक असल्यास '७५ पैसे वटणावळ अधिक पाठवावी

ब. मो. पुरंदरे

राजहंस प्रकाशित

४१९ नारायण, पुणे





राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.